RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



रविवार, २१ डिसेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २७२ | दैनिक | किंमत : ₹५/-
Sunday, 21 December 2025 | Year : 5 | Issue : 272 | Daily | Rate: Rs. 5/-

## एपस्टीनच्या मेलमध्ये 'मोदी ऑन बोर्ड'चा उल्लेख

### पृथ्वीराज चव्हाण यांचा दावा



**कराड :** अमेरिकेतील बहुचर्चित एपस्टीन फाईल्सबाबत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पुन्हा एकदा खळबळजनक दावा केला आहे. 19 डिसेंबरला अमेरिकन काँग्रेसने एपस्टीन फाईल्समधील अंशतः माहिती सार्वजनिक केली आहे. जवळपास 30 हजार फोटो, ईमेल आणि अन्य डेटा यात असल्याने ही संपूर्ण फाईल सार्वजनिक करण्यासाठी आणखी काही आठवडे लागतील असे तिथल्या अटॉर्नी जनरल यांनी सांगितले आहे. 19 तारखेला फाईलमधील काही माहिती समोर आली. त्यात केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांचा उल्लेख आढळला आहे. त्याशिवाय मोदी ऑन बोर्ड असा एपस्टीनने पाठवलेल्या ईमेलमध्ये लिहिले आहे त्यामुळे त्याबाबत सरकारने खुलासा केला पाहिजे अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांनी केली.

कराड येथील पत्रकार परिषदेत पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, एपस्टीन फाईलमध्ये अनेक फोटो आहेत. त्यात स्वतः डोनाल्ड ट्रम्प यांचे फोटो असल्याने ते दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. ज्या खासदाराने एपस्टीन फाईल्सबाबत विधेयक मांडले होते, ते मूळ भारतीय वंशाचे आहेत. त्यांनी एका मुलाखतीत आम्ही जारी केलेले पुरावे पाहत आहोत पण आमचे समाधान होत नाही असे म्हटले आहे. अमेरिकन सरकारकडून काही माहिती लपवण्याचा प्रयत्न होत आहे. जी माहिती समोर आली आहे त्यातील ईमेलमध्ये काही उल्लेख भारतीयांचा आहे. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचे नाव एका ईमेलमध्ये आहे असे त्यांनी सांगितले.

त्याशिवाय ट्रम्प यांच्या प्रशासनातील एक मोठा अधिकारी ज्याला भारताच्या पंतप्रधानांना भेटायचे होते. त्याने एपस्टीनला ईमेल केला होता. त्यानंतर काही दिवसांनी मोदी ऑन बोर्ड असे उत्तर एपस्टीनकडून त्याला मिळाले होते.

#### मोदी आणि एपस्टीन संपर्क कसा ?

एपस्टीन फाईल्समधून काही नावे समोर आलीत, त्यात त्यांनी गुन्हा केलाय का हे सांगता येणार नाही. परंतु एपस्टीनसोबत यांचे संबंध कसे आले हा प्रश्न आहे. 2008-09 या काळात एपस्टीनला लैंगिक शोषणाखाली शिक्षा झालीय. तो गुन्हेगार आहे सगळ्यांना माहिती होते. मोदींचा संदर्भ 2014 मधला आहे. एपस्टीन हा विकृत प्रवृत्तीचा माणूस आहे. देहव्यापार करतो हे माहिती असताना मोदी आणि एपस्टीन यांची गाठ कुणी घालून दिली? हरदीप पुरी हे अमेरिकेत भारताचे राजदूत होते. त्यांचेही नाव आलं आहे. हे सगळे शोधावे लागेल असे सांगत भारत सरकारकडून यावर खुलासा होत नाही हा चिंतेचा विषय आहे असे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

याचा अर्थ मोदी भेटायला तयार आहेत. आता मोदी आणि एपस्टीन यांचे काय नाते आहे? जो मोदींची भेट कुणालाही देऊ शकतो याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. त्यासोबत एक माजी खासदार आणि मोठे उद्योगपती अनिल अंबानी यांचेही नाव आहे. अमेरिकेत राहणारे भारतीय वंशाचे आरोग्य क्षेत्रातील मोठे व्यक्ती आहेत त्यांच्याही नावाचा उल्लेख आहे. अजूनही या फाईल्समध्ये काय काय माहिती आहे याचा शोध घेतला जात आहे. ही माहिती सार्वजनिक असल्याने कुणालाही सहज उपलब्ध होईल असं पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेन संसदेकडून एपस्टीन फाईल्सबाबत स्वतंत्र वेबसाईट बनवली आहे. त्यात सगळी माहिती वाचता येईल. आतापर्यंत खटल्यात काय काय समोर आले ती प्रचंड सामुग्री डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचे विश्लेषण करायला काही काळ लागेल. मला जी माहिती अमेरिकन माध्यमातून मिळाली त्यातून भारताच्या राजकारणात एपस्टीन फाईलचे परिणाम होतील असं मला वाटत होते. मी कुणाचेही नाव याआधी घेतले नव्हते. भारताच्या राजकारणात आमुलाग्र बदल होईल असे विधान मी केले होते. त्याची खूप चर्चा झाली. देशभर ते विधान गाजले. बाल लैंगिक शोषणाचे हे प्रकरण फार गंभीर आहे. अमेरिकेत यावर संघर्ष सुरू आहे. एपस्टीन फाईलबाबत माहिती समोर यायला आणखी काही आठवडे लागतील असंही पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

## राजधानी एक्स्प्रेसचा अपघात, धडकेत अनेक हत्तींचा मृत्य



**गुवाहाटी :** आसाममध्ये रेल्वेचा भीषण अपघात झाला. डीएन सैरांग-नवी दिल्ली राजधानी एक्स्प्रेसने रेल्वे रुळ ओलांडत असलेल्या हत्तींच्या कळपाला धडकली. हा अपघातात इतका भयानक होता की, रेल्वेचे इंजिन आणि पाच डब्बे रुळावरून घसरले. रेल्वेच्या धडकेत सात हत्तींचा मृत्यू झाला असून, रेल्वेतील प्रवाशी सुदैवाने सुखरूप राहिले.

लुमडिंग रेल्वे विभाग हद्दीत हा अपघात घडला. जिथे अपघात घडला ते ठिकाण गुवाहाटीपासून 126 किमी दूर आहे. माहिती मिळताच रेल्वेची मदत व बचाव कार्य पथक तातडीने रवाना झाले. स्थानिक लोकांनी सांगितले की, 8 हत्तींचा कळप होता. यातील बहुतांश हत्ती अपघातात मरण पावले. हत्तीचा कळप अचानक दिसला. तो बघून लोको पायलटने इमर्जन्सी ब्रेक दाबला पण तरीही हा अपघात घडलाच.

रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, रेल्वेचे पाच डब्बे आणि इंजिन रुळावरून उतरल्यामुळे, तसेच हत्तींचे मृतदेह रुळावरच पडलेले असल्यामुळे आसाम आणि पूर्वेकडील राज्यात जाणाऱ्या काही रेल्वे गाड्या तुर्तास रद्द करण्यात आल्या आहेत. तर काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

एक्स्प्रेसचे पाच डब्बे घसरले. त्यामुळे या डब्यातील प्रवाशांना दुसऱ्या डब्यांमध्ये जागा करून देण्यात आली आहे. जे डब्बे रुळावरून घसरले आहेत, ते वेगळे करण्यात आले आहेत. युद्धपातळीवर काम केल्यानंतर हत्तींचे मृतदेह आणि डब्बे रुळावरून हटवण्यात आले आणि त्यानंतर रेल्वे गुवाहाटीच्या दिशेने रवाना झाली

## मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर

### काँग्रेसची मोठी घोषणा

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा बिगूल वाजला असून गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या या निवडणुकीसाठी आता सर्वच पक्ष कंबरकसून कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षांची जुळवा-जुळवही सुरू आहे. दरम्यान आज, काँग्रेस मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढवेल, अशी घोषणा महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली आहे. तसेच, मुंबई महानगरपालिकेची निवडणूक गेल्या चार वर्षांपासून झालेली नाही. सुप्रिम कोर्टामुळे निवडणूक होत आहे. सरकारच थेट महानगरपालिका चालवत होते. या लोकांची निवडणूक घेण्याची इच्छा नव्हती, निवडणूक प्रणालीचा स्वीकर करण्याची यांची इच्छा नव्हती, असा आरोपही चेन्निथला यांनी यावेळी केला.

चेन्निथला म्हणाले, आम्ही वर्षा गायकवाड आणि आमच्या सर्व वरिष्ठ नेत्यांच्या नेतृत्वात, प्रदुषणाविरोधात, रुग्णालयांतील परिस्थिती संदर्भात, भ्रष्टाचारासंदर्भात, आंदोलने केली आहेत. गेल्या काही दिवसांत महानगरपालिकेत काय झाले आणि काय नाही झाले, हे जेनतेला माहीत आहे. सर्वसामान्यांना आजही त्रासांना सामोरे जावे लाग आहे. सर्वसामान्यांना, गरिबांना कुठल्याही प्रकारची मदत मिळत नाहीये. एवढा भष्टाचार वाढला आहे. यामुळेच काँग्रेस पक्षाने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे, आम्ही भाजप विरोधात लढणार, आम्ही ठाकरेंच्या शिवसेने विरोधातही लढणार.

## राज्यात नवीन 98 दिवाणी न्यायाधीशांच्या नियुक्त्या



**वर्धा :** राज्यात नवीन 98 दिवाणी न्यायाधीशांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यात वर्धा जिल्ह्यातील काहींचा समावेश आहे. 2022 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एकूण 114 दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी या पदासाठी जाहिरात संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. त्या अनुषंगाने 2023 मध्ये पूर्व परीक्षा आणि 2024 मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली होती. मुलाखतीअंती मार्च 2025 मध्ये एकूण 114 जागांची तात्पुरती यादी जाहीर करण्यात आली होती. मात्र, त्यात काही उमेदवार वयोमर्यादेत न बसल्यामुळे व इतर आधारावर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांचा निकाल राखीव ठेवून ऑगस्ट 2025 मध्ये 103 परीक्षार्थींची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. 10 उमेदवारांची प्रतीक्षा यादी प्रसिद्ध केली.

संबंधित पोलिस ठाण्यांकडून उमेदवारांची पडताळणी, दस्तावेज पडताळणी झाल्यानंतर 25 नोव्हेंबरला मंत्रालयातील विधी व न्याय विभागाने पाच उमेदवारांना वगळून 98 उमेदवारांच्या नियुक्तीची अधिसूचना जारी केली होती. या उमेदवारांना नियुक्तीपत्रसुद्धा जारी केले होते. त्यानंतर नवीन 98 दिवाणी न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली आहे. कनिष्ठ न्यायालयात अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे न्यायाधीशांच्या जागा तातडीने भरणे आवश्यक होते. त्यानुसार एकूण 98 दिवाणी न्यायाधीशांच्या पदस्थापनेचे आदेश उच्च न्यायालयाकडून निर्गमित करण्यात आले आहे. या वर्धा जिल्ह्यातील युक्ता विनोद कडू, खुशबू गोपाल झंझोटे, हर्षवर्धन आनंद कान्नव यांची नागपूर येथे नियुक्ती झाली आहे. वर्धा येथे योजना अशोक बावरे, अनिकेत लीबाराव कोकरे, आशिष जयंद्र बोरकर, अनुजा अनिल तेलंग, कृष्णा भगवान गावंडे यांना दिवाणी न्यायाधीशपदी नियुक्ती देण्यात आली आहे.

## महत्त्वाच्या बातम्या

### पंजाबमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा पराभव

**चंदीगड :** राजधानी दिल्लीपाठोपाठ बिहार विधानसभेची निवडणूक जिंकून विजयाच्या गतीवर स्वार झालेल्या भाजपाला पंजाबमध्ये पराभवाचा धक्का बसला आहे. पंजाबमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला आहे. या निवडणुकीत सत्ताधारी आम आदमी पार्टीला मोठे यश मिळाले आहे. काँग्रेससह शिरोमणी अकाली दल पक्षानेही निवडणुकीत चांगली कामगिरी केली आहे. 2027 मध्ये पंजाब विधानसभेची निवडणूक होणार आहे, त्यामुळे या निवडणुकांना विशेष महत्व प्राप्त झाले होते.

यादरम्यान निवडणुकांमध्ये पराभव होताच भाजपाने सत्ताधारी आम आदमी पार्टीवर गंभीर आरोप केले आहेत. मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील सरकारने निवडणुका जिंकण्यासाठी सरकारी यंत्रणांचा गैरवापर केल्याचे भाजपाने म्हटले आहे. निकालाचे कल हाती आल्यानंतर भाजपाच्या अनेक नेत्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. पंजाबमधील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे निकाल गुरुवारी (18 डिसेंबर) जाहीर झाले. या निकालांनी सत्ताधारी आम आदमी पार्टीला मोठा दिलासा दिला; तर भाजपाला पराभवाचा सामना करावा लागला.

विशेष बाब म्हणजे- काँग्रेस आणि शिरोमणी अकाली दल पक्षानेही या निवडणुकांमध्ये जोरदार मुसंडी मारली. आम आदमी पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी हा विजय भगवंत मान सरकारच्या कामावर जनतेने मारलेली मोहोर असल्याचे म्हटले. सत्तेत येऊन चार वर्षे पूर्ण होत असतानाही सरकारविरोधी लाट नसल्याचा दावा पक्षाने केला. मात्र, विधानसभा अध्यक्षांच्या गावात आणि मुख्यमंत्री मान यांच्या बालेकिल्ल्यातील (सांग्रूर) काही जागांवर आपला पराभव स्वीकारावा लागला.

## सोलापूरच्या माळरानावर सापडले सर्वात मोठे दगडी चक्रव्यूह



**सोलापूर :** महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवात आणखी एका सुवर्ण अध्यायाची भर पडली आहे. सोलापूर जिल्ह्यातील बोरामणी येथील गवताळ प्रदेशात तब्बल दोन हजार वर्षे जुनी आणि भारतामधील आतापर्यंतची सर्वात मोठी वर्तुळाकार दगडी चक्रव्यूह रचना सापडली आहे. या शोधामुळे प्राचीन भारत आणि रोमन साम्राज्यातील व्यापाराचे ऐतिहासिक धागेदोरे पुन्हा एकदा उजेडात आले आहेत.

विशेष म्हणजे, हा शोध कोणत्याही उत्खननातून नव्हे, तर निसर्गप्रेमींच्या सतर्कतेमुळे लागला आहे. सोलापूरच्या नेचर कन्झर्वेशन सर्कलची टीम बोरामणी वनक्षेत्रात दुर्मिळ सोनचिरैया आणि लांडग्यांच्या निरीक्षणासाठी गेली होती. यावेळी पप्पू जमादार, नितीन अन्वेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जमिनीवर दगडांची एक विशिष्ट मांडणी दिसली. त्याचे ऐतिहासिक महत्व ओळखून त्यांनी तातडीने पुरातत्व अभ्यासकांशी संपर्क साधला. पुण्यातील डेक्कन कॉलेजचे पुरातत्व अभ्यासक सचिन पाटील आणि प्रा. पी. डी. साबळे यांनी या स्थळाचा अभ्यास केला असता, काही महत्वाच्या बाबी समोर आल्या.

भारतात आतापर्यंत जास्तीत जास्त 11 सर्किट्स असलेली चक्रव्यूह रचना सापडली होती. मात्र, बोरामणीची ही रचना 15 सर्किटची असून ती 50 फूट बाय 50 फूट व्यासाची आहे. ही रचना लहान दगडी गोट्यांपासून बनलेली आहे. सभोवतालच्या जमिनीपेक्षा ही जागा 1 ते 1.5 इंच उंच असल्याने गेल्या अनेक शतकांपासून ती मानवी हस्तक्षेपाशिवाय सुरक्षित राहिली आहे. या शोधाचा सर्वात मोठा पैलू म्हणजे त्याचे रोमन कनेक्शन. ही रचना पहिल्या ते तिसऱ्या शतकातील रोमन नाण्यांवरील चक्रव्यूहाच्या नक्षीशी तंतोतंत जुळते. सातवाहन काळात महाराष्ट्रातील तेर (धाराशिव), कोल्हापूर आणि कराड हा भाग जागतिक व्यापाराचा मोठा मार्ग होता. रोमन व्यापारी या चक्रव्यूह रचनेचा वापर नेव्हिगेशनल मार्कर म्हणून करत असावेत, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. त्याकाळी भारतातून मसाले आणि रेशीम रोममध्ये जायचे, तर बदल्यात सोन्याची नाणी भारतात येत असत. या ऐतिहासिक शोधाची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. लंडनचे प्रसिद्ध चक्रव्यूह संशोधक जेफ सावर्ड यांनी याला अत्यंत दुर्मिळ शोध म्हटले आहे. युकेमधील प्रतिष्ठित कॅरड्रोइया या आंतरराष्ट्रीय जर्नलच्या 2026 च्या आवृत्तीत या शोधावर सविस्तर लेख प्रसिद्ध केला जाणार आहे.

## वन विभागाच्या लाकूड विक्रीत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार

**नागपूर :** विदर्भातल्या वनांमधून निघणाऱ्या लाकडांची खुल्या पद्धतीने विक्री करून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला जात आहे, असा गंभीर आरोप करणारी जनहित याचिका ॲड. अरविंद मून यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केली आहे. लाकडांची खुल्या पद्धतीने विक्री बंद करून ई-लिलाव विक्री प्रक्रियेचे पालन करण्यात यावे, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

विदर्भामध्ये घनदाट वने आहेत. त्यामुळे राज्यातील 80 टक्के प्रमुख लाकूड डेपो विदर्भातच आहेत. या डेपोंमधील लाकडांचा दर महिन्यात लिलाव केला जातो. त्यातून राज्य सरकारला कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळतो. ई-गव्हर्नन्स धोरण-2011 आणि 3 डिसेंबर 2014 रोजीच्या अधिसूचनेनुसार याकरिता ई-लिलाव प्रक्रियेचा उपयोग करणे बंधनकारक आहे. परंतु, वनाधिकारी ई-लिलाव प्रक्रिया डावलून खुल्या विक्रीला प्रोत्साहन देत आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र वन विकास महामंडळाला तक्रार केली असता, त्यांनी योग्य दखल घेतली नाही, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे.

परिचय मेळावा



बुद्धिस्ट मंगल परिणय तर्फे दि. 28 डिसेंबर 2025 रोजी वधू-वर परिचय मेळावा घेण्यात येत आहे. इजिं (IIT), MBA (IIM)
बँक अधिकारी, रेल्वे, Gort / Pvt, बिझिनेस, व इतर भरपूर स्थळे उपलब्ध (बुकिंग सुरु)
संपर्क : सौ सुनंदा वासे
मनिषनगर, नागपूर, 9371037407/9373210249

## आजचे कार्यक्रम

**त्रिरत्न बौध्द महासंघ केंद्र**

सुखावती नागपूर एकदिवसीय धम्म शिबिर
रविवार दि. 21/12/2025 सकाळी 10-30 वाजता
प्रवचनकार धम्मचारी रत्नोदय
स्थळ : रत्नशिल बुद्ध विहार, आदर्श नगर नागपूर






“ जी गोष्ट शस्त्राने होणार नाही
ती कधीकधी एका मनमोकळ्या हास्याने होते... ”



## माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा म्हणून झालेले जगातील एकमेव ऐतिहासिक युद्ध म्हणजे

# भिमाकोरेगावचे युद्ध



**भिमाकोरेगाव युद्धातील सिद्धनाक महार यांचा थेट वंशज व ऐतिहासिक माणगांव परिषदेचे स्वागत अध्यक्ष दादासाहेब (राजेसाहेब) इनामदार यांचा नातू मिलिंद इनामदार(सरकार)यांचा हा खास लेख दैनिक बहुजन सौरभ वाचकांसाठी.....**

सर्वांना क्रांतीकारी जयभीम

मी मिलिंद इनामदार (सरकार), भिमाकिरेगाव युद्धातील सर सेनापती सिद्धनाक महार यांचा थेट वंशज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितांचे नेते घोषित करण्यासाठी कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी 21 व 22 मार्च 1920 साली जी ऐतिहासिक माणगांव परिषद घेतली होती. त्या माणगांव परिषदेचे स्वागत अध्यक्ष दादासाहेब (राजेसाहेब) इनामदार यांचा मी नातू असून सर सेनापती सिद्धनाक महार यांना इनाम मिळालेल्या सांगली जिल्हा मिरज तालुका येथील कळंबी या गावी मी रहातो, पूर्वी आमचे आडनाव वाघमारे असे होते. पण 1739 साली आम्हाला कळंबी हे गाव इनाम मिळाले तेव्हा पासून इनामदार(सरकार) हे नाव प्रचलित झाले. भिमा कोरेगावचे ऐतिहासिक युद्ध 1 जानेवारी 1818 ला झाले होते. आज 2026 मध्ये आपण पदार्पण करीत आहोत. म्हणजे भिमा कोरेगाव युद्धाला आज 207 वर्षे पूर्ण होत आहेत, तरी ही फक्त भिमा कोरेगाव व सर सेनापती सिद्धनाक महार यांचे नाव उच्चारता आज ही अंगावर शहारे उभे रहातात. अंगातील रक्त गरम होते व अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सळसळते एक नवी एनर्जी मिळते. मनातील भीती कोठे गायब होते आपणास ही नाही समजत. अंगात 12 हत्तीचे बळ संचारते व जगात माझ्यासाठी अशक्य असे कांहीच नाही ही भावना नक्कीच निर्माण होते. पोटात अन्न नाही, प्यायला पाणी नाही, अंगावर कपडा नाही, बाहेर फिरायला बंदी, गळ्यात थुंकायला मडके, जमिनीवर पावले उठू नयेत म्हणून पाठीवर भला मोठा खराटा महार येत आहे हे कळावे म्हणून हातात घुंगराची काठी, रस्त्याने चालताना समोरून ब्राम्हण आला किंवा पाण्याची विहीर असेल त्यावर महारांची सावली पडू नये, दंडवत घालत पोटाने फरफरटत घसटायचे, शस्त्र बाळगायचे नाही, पैसा साठवायचा नाही, ब्राम्हणाकडे नजर वर करून पहायचे नाही. अशा मानवजातीलाही शरमेने मान खाली घालावी लागेल अशी जिंदगी आपले पूर्वज जगत होते. पण अशाही परिस्थितीत ते या परिस्थितीशी लढत होते हे विशेष, इतकी जाचक बंधने असूनसुद्धा आमचे पूर्वज 6, 7, फुट उंचीचे व शरीराने धष्टपुष्ट असत एखादी पेशवाची महाराणी यांच्याकडे चोरट्या नजरेने पहात असे. यावर बरेच काही लिहिण्यासारखे आहे. पण मी ते इथे लिहिणे जाणून बुजून टाळत आहे. मला काय लिहायचे हे आपण समजून घेण्यात सक्षम आहात याची मला पूर्ण खात्री आहे. 1795 ला खर्डा येथे बाजीराव पेशवे व मोगल सैन्य यांच्यात एक घनघोर युद्ध झाले होते. या लढाईत बाजीराव पेशवे यांच्या सैन्याचे सर सेनापती होते परशुरामभाऊ पटवर्धन या सैन्यात सिद्धनाक महार व त्यांचे 500 शूर योद्धे ही बाजीराव पेशवे यांच्या सैन्यात होते लढाईच्या रणांगणा शेजारीच सर्व सैनिकांचे राहण्याचे तंबू थाटले होते, त्यात सर्व जातीचे सैन्य होते. सिद्धनाक महार यांचा तंबू परशुराम भाऊ सेनापती यांच्या तंबू शेजारीच होता. हे काही ब्राम्हण पेशवांना खटकले. त्यांनी बाजीराव पेशवे यांच्या निकटवर्ती असलेल्या हिरोजी पाटणकर यांच्याकडे याची तक्रार केली की हा सिद्धनाक महार यांचा तंबू येथून हटवावा. हे ऐकताच हिरोजी पाटणकर यांनी ती मागणी धुडकावून लावत त्या तक्रार करण्यासाठी आलेल्या ब्राम्हण मंडळींना सुनावले की, ‘ही काही जेवणाची पंगत नाही, ज्याची तलवार खंबीर आहे. त्याचा तंबू सेनापती यांच्या तंबू शेजारीच असणार; ही बातमी जेव्हा सिद्धनाक यांना समजली तेव्हा ते जाहीरपणे सर्वांना म्हणाले, अरे इतके वर्षे आम्ही आपल्या जीवाची बाजी लावून लढत आहोत तरीही आपण आम्हाला महारांचा तंबू इथून हटवा असे म्हणत आहात हा आमच्या शूरतेचा अपमान आहे. आमची तलवार कशी चालते व आम्ही काय करतो हे आपण उद्या मोगलांविरुद्ध लढताना पहा असा सज्जड दमच सिद्धनाक यांनी दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी युद्ध सुरू झाले. मोगलांनी युद्धात बाजीराव पेशवे याचे सेनापती असलेल्या सेनापती परशुराम भाऊ यांना मोगल सैनाचा मुकाबला कसा करावा या चिंतेत ते असतानाच त्यांना मोगल सैन्याने चारी बाजुंनी घेरले. ही बातमी जेव्हा रंगणावर लढत असलेल्या सिद्धनाक यांना समजली, तेव्हा त्यांनी विजेच्या चपळाईने आपला घोडा त्या दिशेने घेऊन जाऊन परशुराम भाऊ यांना त्यांनी त्या विळख्यातून सोडवले व त्यांचे प्राण वाचवले. त्यांना एका सुरक्षित ठिकाणी ठेवून युद्धाची सारी सूत्रे आपल्या हाती घेत हरलेली ही लढाई आपल्या मनगटाच्या जोरावर बाजीराव पेशवे यांना जिंकून दिली. ही बातमी जेव्हा बाजीराव पेशवे यांना समजली तेव्हा ते खरे तर आनंदी व्हायला हवे होते. पण तसे घडले नाही. सिद्धनाक महार व त्यांच्या 500 शूर योद्धांनी ही लढाई जिंकून दिली याची त्याला लाज वाटली आणि भिमाकोरेगाव युद्धाची खरी ठिणगी इथे पडली. अनेक युद्धे जिंकून देऊनही आम्हाला महार असे संबोधले याचा राग सिद्धनाक यांच्या मनात घर करून कायम स्वरूपी राहिला आणि त्यांनी यांच्या पुढे बाजीराव पेशवे यांच्या बाजूने न लढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने बाजीराव पेशवा अधिक संतापला त्याने महार जातीवर अधिक कडक निर्बंध लावले जो कोणी व्यक्ती गळ्यात मडके व पाठीला खराटा न बांधता रस्तावर दिसेल त्याचे मुडके जागीच कलम करावे, असा आदेशच पेशवाने काढला.1795 नंतर इंग्रजांनी आपले पाय संपूर्ण भारतात पसरविले होते. त्यांनी बाजीराव पेशवे यांनाही काही रक्कम देऊन इंग्रजांचे बाटलीकत्व स्वीकार करण्यास मजबूर केले होते. तरीही बाजीराव पेशवे व इंग्रज सैन्य यांच्यात 1795 नंतर एकून 5 युद्धे झाली त्या 5 ही युद्धात बाजीराव पेशवे यांना पराभव स्वीकारावा लागला होता. इकडे सिद्धनाक महार या साऱ्या घडणाऱ्या घडामोडीनवर बारीक लक्ष ठेवून होते. त्याच्या मनात आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी लाव्हारस सारखा उसळी मारत होता. पण अपुरे सैन्य अपुरी शस्त्रे त्यामुळे ते मनात बदला घेण्याची आग भडकत असतानाही ते शांत होते. बदला तर घ्यायचा आहे पण मार्ग दिसत नाही, खूप विचार करूनही काही मार्ग नाही निघत या निर्णयावर ते आले व शेवटी त्यांनी परत बाजीराव पेशवे यांना भेटून आम्ही आपल्या बाजूने लढण्यास तयार आहो. पण आपण आमच्या वरील हे सारे अन्याय दूर करावेत अशी विनंती करण्याचे ठरले. आपले विश्वासू काही सैन्य घेऊन ते बाजीराव पेशवे यांच्या समोर उभे राहिले. राजा या नात्याने त्यांना मुजरा घालून ते त्यांना म्हणाले, ‘राजे झाले गेले विसरून जाऊन आम्ही आजही आपल्यासोबत आपल्या बाजूनी इंग्रज सैन्याविरुद्ध लढण्यास तयार आहोत. आमच्या मनगटावर व आमच्या तलवारीवर आमचा विश्वास आहे. आम्ही त्यांचा पराभव नक्की करू. फक्त आपण आमच्या समाजावरील अन्याय दूर करा. त्यांना माणूस म्हणून जगू द्या, अशी विनंती त्यांनी पेशवा बाजीराव यांना केली. हे ऐकून बाजीराव पेशवे रागाने लालेलाल झाले व ते जोरात किंचाळले, ‘तुमची हिम्मतच कशी झाली माझ्या समोर उभे राहून ताठ मानेने असे बोलण्याची? अरे तुम्ही किती ही शूर असला तरी तुम्ही आमचे गुलाम आहात व गुलामच राहणार आणि प्रश्न अन्याय दूर करण्याचा व मानसन्मान देण्याचा. अरे सुईच्या टोकावर जितके अनु बसू शकतात तितकी ही किंमत आम्ही तुम्हाला नाही देऊ शकत. चला इथून बाहेर पडा. नाही तर तुमच्याही गळ्यात मडके व पाठीवर खराटा बांधू. हे त्यांचे बोलणे ऐकून सिद्धनाक यांचाही राग अनावर झाला. पण त्यांनी वेळेचे भान ठेवत शांत रहाणे पसंत केले. कारण रागाच्या भरात आपण इथे काही बोललो तर बाजीराव पेशवा आपल्यास कैद करून आपला वधही करू शकेल हे त्यांनी हेरले व शांत पावलांनी ते तिथून बाहेर पडले, घडलेला प्रकार त्यांनी आपल्या सर्व 500 शूर सैनिकांना समोर कथन केला. पुढे काय करायचे याची खूप अभ्यासपूर्ण दिवसभर मंथन झाले व शेवटी सर्वानुमते एक निर्णय झाला. तो म्हणजे शत्रूच्या शत्रूला आपला मित्र बनवायचे व बाजीराव पेशवे यांच्या विरुद्ध लढायचे. अनेक युद्धे जिंकून देणाऱ्या सिद्धनाक यांच्या महार या जाती प्रति बाजीराव पेशवे यांच्या मनात किती हा महाभयंकर तिरस्कार, घृणा व चीड होती हे त्याच्या मग्रूरीच्या या बोलण्यातून दिसून येते. ही बातमी इंग्रजांना कळली. त्यांनी सिद्धनाक यांची भेट घेतली व आपण जर आम्हाला युद्धात बाजीराव पेशवे विरुद्ध लढण्यास सहकार्य केले तर आम्ही आपल्या समाजावरील जाचक अटीतून मुक्तता देऊ असे आश्वासन दिले. सिद्धनाक यांनीही त्याला होकार दर्शविला, रणनीती ठरली, इंग्रज व सिद्धनाक यांची युती झाली, ही बातमी बाजीराव पेशवे यांना समजली. तेव्हा ते मोठमोठ्याने हसले व म्हणाले ‘दोन्ही दुश्मनांना एकाच वेळी संपविण्याची नामी संधी मला मिळाली आहे. ते खूप मोठे सैन्य गोळा करू लागले. त्यांनी 30 हजार सैन्य गोळा केले. त्यांना शनिवारवाडा पुणे येथे ठेवण्यात आले. इंग्रज सैन्याची एक तुकडी कॅप्टन स्टोटंन यांच्या नेतृत्वात भिमाकोरेगाव मार्गे पुण्यात येत आहे ही बातमी बाजीराव पेशवे यांना कळल्यावर त्यांनी भिमाकोरेगाव येथे या तुकडीवर हल्ला करण्याचे ठरविले व 31 जानेवारी रोजी दुपारच्या वेळी त्यांनी आपले 28 हजार सैन्य घेऊन सेनापती बापू गोखले यांना इंग्रज सैन्यावर हल्ला करण्याचे आदेश दिले व बापू गोखले यांनी तसे केलेही, अचानक असा हल्ला झाल्याने कॅप्टन स्टोटन ही गोंधळून गेले. 6 वाजता युद्ध थांबले कॅप्टन स्टोटन यांनी शांत डोक्याने विचार केला तेव्हा भिमाकोरेगाव येथून 27 किलोमीटर शिरूर येथे सिद्धनाक महार यांची 500 शूर योद्ध्यांची टोळी आहे हे त्यांना समजले. त्यांनी तात्काळ आपल्या दूतामार्फत सिद्धनाक यांना भिमाकोरेगाव येथे येण्याचा निरोप दिला, बाजीराव पेशवा यांच्याविरुद्ध लढण्याची नामी संधीची वाट पहाणाऱ्या सिद्धनाक यांना हा निरोप मिळताच क्षणाचा विलंब न करता त्यांनी आपल्या 500 शूर योद्धासोबत भिमाकोरेगावच्या दिशेने पायी चालण्यास नाही तर धावण्यास सुरवात केली. 1 जानेवारी रोजी सकाळी 27 किलोमीटरचे अंतर पायी चालून ही तुकडी तिथे पोचली होती. पोटात अन्न नव्हते. 27 किलोमीटर चालून ते तिथे दाखल झाले होते. पण एका, एका ही सैनिकांच्या चेहऱ्यावर थकवा दिसला नाही, दिसत होती ती फक्त आणि फक्त बदला घेण्याची आग आणि फक्त आग, सिद्धनाक व कॅप्टन स्टोटन यांनी रणभूमीची पहाणी केली. समोरा समोर युद्ध न करता छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची गनिमी कावा ही युद्धनीती वापरून हे युद्ध आपण कसे जिंकू शकतो हे सिद्धनाक यांनी कॅप्टन स्टोटन यांना समजावून सांगितले त्यांनी ही सहमती दर्शवली आणि सकाळी युद्धाला सुरवात झाली. गनिमी कावा युद्धनीती यशस्वी होऊ लागली. महार योद्ध्याचा एक एक वार 4, 4, सैनिकांची शिकार करू लागला. बदला घेण्याच्या सुडाने पेटलेल्या डोळ्यातील आग पाहून पेशवे सैनिक युद्ध करायचे विसरून जीव वाचविण्यासाठी धावा धाव करू लागले. या लढाईचा विजयी टर्निंग पॉईंट ठरला तो बापू गोखले यांचा मुलगा यांचे धड सिद्धनाक यांनी तलवारीने उडवले. ते धड पेशवे सैनिकांनी सेनापती बापू गोखले यांच्या मांडीवर नेऊन ठेवले. ते पाहून बापू गोखले हताश झाला. खरे तर हे धड पाहून सेनापती बापू गोखले रागाने पेटून उठायला पाहिजे होता. ‘आप ने एक मारा है, मैं आप की सारी फौज नेस्तनाबू कर सकता हु’ असे त्याने त्वेषाने बोलून तलवार हाती घ्यायला हवी होती. पण घडले नाही म्हणून मी या गोष्टीला युद्ध हरणाचा टर्निंग पॉईंट म्हणत आहे. तो हताश होऊन मोठमोठ्याने रडत बसला. पूर्णपणे खचून गेला व आपल्या सैनिकांना आदेश देणेच विसरून गेला. सेनापती हताश झाल्याचे पाहून पेशवे सैनिक आपला जीव वाचवण्यासाठी रणांगण सोडून फक्त पळू लागले. अशा या ऐतिहासिक भिमाकोरेगाव युद्धात सिद्धनाक सेनेने विजय प्राप्त केला, असा हा आपला गौवरशाली व आजअमर इतिहास. या ऐतिहासिक युद्ध विजयानंतर सिद्धनाक व कॅप्टन स्टोटन हे शनिवारवाडा येथे आले असता सातारा गादीचे छत्रपती शाहू महाराज यांचे दत्तक पुत्र प्रतापसिंह भोसले यांना बरेच वर्षे कैद केले होते व त्यांना शनिवारवाडा येथे ठेवले होते. सिद्धनाक यांनी कॅप्टन स्टोटन यांना प्रतापसिंह भोसले याची तुरूंगातून सोडून देण्याची विनंती केली व त्यांनी ती मान्य केली. कैदेतून बाहेर आल्यावर प्रतापसिंह भोसले यांनी सिद्धनाक यांचे आभार मानले व ते म्हणाले, ‘सांगा आपणास काय इनाम देऊ, त्यावेळी सिद्धनाक त्यांना म्हणाले, छत्रपती शाहू महाराज यांनी आम्हाला कळंबी हे गाव इनाम दिलेलेच आहे. त्यामुळे मला काही नको. पण आपणास आमच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा असेल तर आमच्या समाजातील मुलांना शिक्षण घेण्यासाठी आपण शाळा सुरू कराव्यात आणि काय योगायोग पहा सातारा येथील प्रतापसिंह हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1997 साली आपल्या पहिलीच्या वर्गात प्रवेश घेऊन शिक्षणाची सुरवात केली. भिमाकोरेगावच्या ऐतिहासिक विजयानंतर आपल्या दैनंदिन जीवनात खूप मोठे बदल घडले. या विजयानंतर खऱ्या अर्थाने आपण माणूस म्हणून जगू लागलो, माणूस म्हणून माणसात मिसळू लागलो, लोक आपल्याला मानसन्मान देऊ लागले, आपल्यासाठी शैक्षणिकद्वारे खुली झाली, जातीयवादाची तीव्रता खूप कमी झाली अशा अनेक घटनांनी आपले जीवन सुधारत गेले. आज आपण जे काही आहोत ते केवळ आणि केवळ विश्वरत्न, बोधिसत्व विश्वगुरु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आहोत, या मतांशी मी पूर्ण सहमत. पण 1 जानेवारी 1927 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: या या विजय स्तंभला सलामी देण्यासाठी गेले होते. यावरून या ऐतिहासिक लढाईचे आपल्या जीवनातील महत्व किती महान आहे हे सिद्ध होते. इथे मी एक गोष्ट जाणीवपूर्वक सांगू इच्छितो, भिमाकोरेगावच्या ऐतिहासिक युद्धात आपण विजय प्राप्त केला, म्हणूनच आपण क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व विश्वरत्न बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे क्रांतिकारी युग पुरुष पाहू शकलो हे सत्य आहे. हेच सिद्धनाक महार सोडून इतर कोणत्या जातीत जन्मले असते तर आज संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यातील एक सिद्धनाक स्मारक उभे राहिलेले दिसले असते. पण दुर्दव्य जात आडवी येते. ■ ■



मिलिंद इनामदार
मो. 9860723777

# सत्ता, मौन आणि कायद्याची जबाबदारी





**एपस्टीन फाईल्स, लैंगिक गुन्हे आणि भारताची वस्तुस्थिती**

जागतिक पातळीवर गाजलेल्या जेफ्री एपस्टीन फाईल्स प्रकरणाने पुन्हा एकदा सत्तेच्या आड लपलेल्या भयावह वास्तवाचे रूप उघड केले आहे. या फाईल्समध्ये अनेक प्रभावशाली व्यक्तींची नावे समोर आली आणि मानवतेला एक अस्वस्थ करणारा प्रश्न पुन्हा उपस्थित झाला. सत्ता, पैसा आणि मौन या त्रिसूत्रीच्या जाळ्यात मानवतेचे काय होते? जरी या प्रकरणात कोणत्याही भारतीय व्यक्तीवर थेट आरोप झालेले नसले, तरी त्यातून आपल्यालाच पाहावे लागणारे आरसे उभे राहतात. भारतातील लैंगिक गुन्ह्यांची स्थिती पाहता हे प्रकरण आपल्यासारख्या समाजांसाठीही कठोर इशारा ठरते. भारतातील कटू वास्तवराष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्युरोच्या आकडेवारीनुसार दरवर्षी भारतात हजारो बलात्कार, सामूहिक बलात्कार, लैंगिक छळ, अल्पवयींवरील अत्याचार आणि मानवी तस्करीची प्रकरणे नोंदवली जातात. ही फक्त आकड्यांची गोष्ट नाही; प्रत्येक आकड्याच्या मागे तुटलेले आयुष्य आणि मौनात हरवलेला आवाज आहे. अनेक गुन्हे अजूनही नोंदवले जात नाहीत. सामाजिक कलंक, आरोपींचा प्रभाव आणि पोलीस यंत्रणेची निष्क्रियता यामुळे. समाज अनेकदा पीडितेवरच बोट ठेवतो, तर आरोपी सत्तेच्या आणि प्रतिष्ठेच्या कवचात नजरेआड राहतो. ‘नाव’ म्हणजे गुन्हा नाही, पण मौन म्हणजे सहभागी एपस्टीन फाईल्समधील एक धडा स्पष्ट आहे. नाव समोर येणे म्हणजे दोष सिद्ध होणे नाही. न्याययंत्रणा पुराव्यांवर चालते. मात्र, जेव्हा तक्रारीच नोंदवल्या जात नाहीत, तेव्हा न्यायाचा प्रवास सुरूच होत नाही.‘पुरावा नाही’, ‘तो मोठा माणूस आहे’, किंवा ‘हे तुमच्या प्रतिष्ठेला बाधक ठरेल’ अशा कारणांनी तक्रार दाबणे ही व्यवस्थेची चूक नसून, अन्यायाची भागीदारी ठरते. कायद्याची कागदी ताकद आणि अंमलबजावणीतील शिथिलता भारतात स्त्रिया आणि मुलांच्या सुरक्षेसाठी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. IPC कलम 354A ते D - लैंगिक छळाविरोधात IPC कलम 376 - बलात्कारासाठी POCSO Act, 2012 - अल्पवयींवरील लैंगिक अत्याचारांविरोधात IT Act - ऑनलाइन शोषणावर नियंत्रण CrPC कलम 154 - FIR नोंदवणे बंधनकारक सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिला आहे की, दखलपात्र गुन्हा दिसताच FIR नोंदवणे अनिवार्य आहे. तरीही अनेक ठिकाणी पोलीस तक्रारी नाकारतात. FIR नाकारल्यास CrPC 154(3), 156(3) अंतर्गत पुढील पातळ्यांवर तक्रार दाखल करता येते; पण बहुतेक पीडितांना ही प्रक्रिया माहीत नसते. माध्यमे आणि समाजाची जबाबदारी एपस्टीन प्रकरणाने दाखवून दिले की, तपास पत्रकारिता समाजाला हादरवू शकते आणि दडवलेली सत्ये उजेडात आणू शकते. भारतीय माध्यमांनीही अशीच जबाबदारी घ्यावी. पीडितेचे संरक्षण करताना सनसनाटीपणा टाळावा आणि आरोपांऐवजी सत्यशोधनावर भर द्यावा. समाजाने प्रश्न बदलला पाहिजे, ‘ती गप्प का राहिली?’ ऐवजी ‘व्यवस्था अपयशी का ठरली?’ हा प्रश्न विचारला पाहिजे. निष्कर्ष - न्याय सत्तेपेक्षा बुलंद असला पाहिजे. एपस्टीन फाईल्स हे फक्त व्यक्तींतील भ्रष्टाचाराचे नाही, तर संस्थात्मक अपयशाचे प्रतीक आहे. भारताला अशा अपयशाची परवड नाही. न्यायव्यवस्था सक्षम तेव्हाच ठरेल, जेव्हा पीडितेला तक्रार नोंदवण्याची भीती वाटणार नाही, तपास निष्पक्ष होईल आणि खटले वेळेत निकाली निघतील. मौन म्हणजे सहमती नाही. ते गुन्ह्याचे संरक्षण आहे. कायदा पीडितांच्या बाजूने उभा आहे, पण तो जिवंत ठेवण्यासाठी प्रत्येकाने आवाज उठवला पाहिजे. सत्ता टिकून राहो किंवा न राहो, न्याय कायम टिकला पाहिजे. कारण समाजाचा पाया तोच आहे. ■ ■



ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे
मो. 9422539451

# हिंदू राष्ट्रात विषमतेला तत्वत: मान्यता





ओबीसी समाज ब्राम्हणांनी पूर्णपणे आपल्या जाळ्यात ओढला आहे. हिंदू धर्माची नशा देऊन त्यांना बेशुद्ध केले. त्याला हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचे दिवास्वप्न दाखवून त्याच्या पायात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय गुलामीच्या बेड्या ठोकल्या. जेव्हा त्याची हिंदुत्वाची नशा उतरेल तेव्हा तो गुलाम झालेला दिसेल. कारण हिंदू राष्ट्र तत्वत: विषमतेच्या वैचारिक पायावर उभे आहे.

**ग्रंथ प्रामाण्य - शब्द प्रामाण्य मानणारा धर्म :-** हिंदू धर्म ग्रंथ हे अपौरुषेय आहेत अशी ते मांडणी करतात हे ग्रंथ माणसाने निर्माण केले नसून देवाने निर्माण केले आहे. त्यामुळे ते सत्य आहेत. त्याची चिकित्सा होऊ शकत नाही. तसेच शंकराचार्य आणि कथा कीर्तन प्रवचन करणारे बाबा बुवा यांचा शब्द खरा मानला पाहिजे हीच सर्व धर्म ग्रंथाची मांडणी आहे.

**महिला, ओबीसी, आदिवासी आणि दलीत गुलाम :-** ऋग्वेदात पुरुष सुक्तात असे सांगितले आहे की ब्राम्हण, क्षत्रिय आणि वैश्य हे सवर्ण आहेत. शूद्र हा चवथा वर्ण अवर्ण आहे. तो या सवर्णांचा गुलाम आहे. म्हणून त्याला ज्ञान, धन, शस्त्र, सत्ता याचा अधिकार नाही. त्यांनी सवर्णांची सेवा म्हणजे गुलामी करावी. त्याच्या संपत्तीवर आणि आई, बहीण, मुलगी आणि बायको यांचेवर देखील सवर्णांचाच अधिकार आहे. म्हणून त्यांचा बलात्कार करणे त्यांना गैर वाटत नाही.

**हिंदू राष्ट्रात शिक्षण बंद करण्यात येत आहे :-** हा बहुजन समाज आणि स्त्रिया या वर्गाला शिक्षण घेण्याचा ब्रिटिश येण्यापूर्वी अधिकार नव्हता. ब्रिटिश राज्य असल्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शाळा काढल्या आणि शिक्षणाला सुरुवात झाली. 1947 साली भारत स्वतंत्र झाला. भारताचे संविधान 1949 पासून अमलात आले. संविधानाने सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार दिला. आज बहुजन समाज शिक्षित झाला. आता हिंदू राष्ट्र निर्माण करण्यात आले. त्यामुळे त्यांनी संविधानाची पायमल्ली करून बहुजन समाजाला मिळालेले अधिकार हळू हळू नष्ट करणे सुरू केले. जिल्हा परिषद आणि नगर पालिका चालवीत असलेल्या शाळा बंद होतील अशी निती अवलंबणे सुरू केले. त्यामुळे गरिबांना मोफत शिक्षण देणाऱ्या शाळा बंद करण्याची सुरुवात झाली. समाजात ज्या निमसरकारी शाळा समाज सेवक लोकांनी सुरू केल्यात त्या खासगी मराठी शाळा अडचणीत येतील असे सरकारी धोरण अवलंबिले जात आहे. त्यामुळे आर्थिक दृष्ट्या गरीब आणि मध्यमवर्गीय समाज हळू हळू शिक्षणातून हद्दपार होणे सुरू झाले आहे. एक दिवस असा येईल की गुलामी करण्याइतके शिक्षण घेऊ देतील आणि पुढील शिक्षण रोखण्यात येईल. ही हिंदू राष्ट्रातील शिक्षण निती आहे आणि तिचा अंमल सुरू झाला आहे.

**हिंदू राष्ट्रात बहुजन निर्धन ठेवण्यात येत आहे :-** शिक्षणामुळे नोकरी मिळत होती. आरक्षण मिळाले म्हणून नोकरी मिळत होती. नोकरी होती म्हणून पगार मिळत होता. पगार होता म्हणून प्रगती होती. यापुढे शिक्षण बंद झाल्याने नोकरी मिळणार नाही. नोकरी नाही म्हणून पगार मिळणार नाही. पगार नाही म्हणून प्रगती होणार नाही. पारंपारीक व्यवसाय करण्याचे बंधन येत आहे. पकोळे तळून विकणे, रील बनून पैसे कमावणे हा रोजगार होय असे प्रधानमंत्री म्हणत असतील तर त्यांना तुम्हाला प्रशासनातील नोकऱ्या मिळण्याची आशा सोडली पाहिजे हेच त्यांना अपेक्षित आहे. आर्थिक गुलामी अशीच लादल्या जात आहे.

**हिंदू राष्ट्रात बहुजन समाज सत्तेच्या बाहेर फेकल्या जातो :-** ज्याला सत्ता प्रस्थापित करायची आहे त्याचे जवळ शिक्षण आणि श्रीमंती पाहिजे. मतं संख्या आपली जास्त असली तरी ते अज्ञान, गरिबी आणि जाती जातीत विभाजित असल्यामुळे त्यांना सत्ता मिळणार नाही. ढोंगी निवडणूक आयोग, ई. व्ही. एम. मसिन आणि गोदी मीडियामुळे आपल्याला सत्तेतून हद्दपार व्हावे लागते. आपल्यातील घरभेदी, त्यांची लाचारी करणारे लोक सत्तेत राहतील आणि समाजाचे विरुद्ध कायदे करतील. बिहार सरकारने आल्याआल्या सनातन धर्म प्रसारासाठी योजना अंमलात आणली. प्रत्येक जिल्हा स्तरावर एक समिती राहील. सर्व मठ आणि मंदिरात सनातन धर्म, रूढी, परंपरा आणि धार्मिक कर्मकांड करतात की नाही, लोकांना करायला लावतात की नाही यावर देखरेख करतील. हे सरकार करीत आहे. या समित्यामध्ये ओबीसी महादलित व्यक्तींना घेतील. मानधन किंवा पगार देतील. ते लोक लाचारी करतील. त्यामुळे तेच लाचार नाममात्र दिघाऊ सत्तेत राहतील. निर्णय घेण्याचा त्यांना अधिकार नसेल.

**शस्त्र बाळगण्याचा अधिकार नाही :-** या गुलामी विरुद्ध जे बोलतील ते मारले जातील आणि जात आहेत. काही लोकांना देशद्रोहाचे कायदे लाऊन तुरुंगात टाकतील. काही लोकांना समाजातून बहिष्कृत करतील. जसे महात्मा ज्योतिबा फुले परिवाराला बाहिष्कृत केले होते. त्यांचेसोबत राहिलो तर आपण तुरुंगात जाऊ या भीतीने लोक चळवळीतील कार्यकर्त्यासोबत संबंध ठेवणार नाहीत. म्हणजे त्यांना बाहिष्कृत करतील. अश्या पद्धतीने गुलामी विरुद्ध लढा रोखल्या जाईल म्हणजे लढण्याचा अधिकार काढून घेण्यात येईल. लाचारीला प्रतिष्ठा आणि पुरस्कार मिळतील. हे आजच 2014 ते 2025 या काळातील सत्तेचे दुष्परिणाम आहेत.

**सत्ताधारी कट्टर धर्मांध हिंदू राहतील :-** मोदी, शहा, फडणवीस, योगी, पांडे हे सवर्ण योजनाबद्ध रीतीने आज सत्तेत आहेत. तसे सर्व राज्यात होईल.1970 नंतर ओबीसी मुख्यमंत्री होऊ लागला होता. त्यापूर्वी ब्राम्हण आणि ठाकूर सवर्ण मुख्यमंत्री असत. आता परत सवर्ण मुख्यमंत्री होऊ लागले. जिथे ते नाहीत तेथे राष्ट्रपती राजवट लागू होईल. ही संसद आजच्या राष्ट्रपती आणि सर न्यायाधीशाप्रमाणे नामधारी राहील. त्याची जागा धर्म संसद घेईल. बाबा बुवा देश चालवतील आणि बुलडोझर राज येईल. ही हिंदू राष्ट्रातील राजकीय सत्ता असेल. ती सुरुवात झाली आहे.

**ओबीसी समाज या हिंदू राष्ट्राचा अभ्यास करतील :-** काल भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समर्थन करणारे ओबीसी युवक हा विचार करू लागले आहेत, हे माझे निरीक्षण आहे. हा विद्रोहाचा सूर आहे असे मला वाटते. त्यामुळे ओबीसीतेतर लोकांनी सावध राहिले पाहिजे. कारण येणाऱ्या काळात हिंदू - मुसलमान, हिंदू - दलीत, हिंदू - आदिवासी (ख्रिश्चन), हिंदु - शीख अस्या दंगली घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल. तो प्रयत्न आपण हाणून पाडला पाहिजे. हीच दक्षता बाळगली पाहिजे. आपल्यातील विकाऊ लोक दंगलीसाठी पुढाकार घेतली. त्यासाठी त्यांना पैसा दिल्या जाईल. म्हणून आपण सर्वांनी सावध व्हावे. परिस्थिती बिकट होत चालली आहे. दंगली झाल्या की पुन्हा ओबीसी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जाळ्यात अडकले जातात. सारी जागृती वाया जाते हा अनुभव आहे. म्हणून सावधान व्हावे.

**हिंदू राष्ट्र म्हणजे हिंदू बहुजनांना गुलाम करणे होय :-** आपला धर्म बुद्ध, महावीर, नानक, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, कबीर, राविदास, बसवेश्वर, गाडगे बाबा या महापुरुषांनी जो सांगितला तो आहे. त्यात बंधुभाव, दया, करुणा, मैत्री आहे. त्यात द्वेष, घृणा नाही. हिंदू राष्ट्र, ब्राम्हणी राष्ट्र असून तो शोषण, घृणा, द्वेष, कपट सांगणारा धर्म प्रस्थापित करीत आहे. म्हणून ओबीसी समाजातील बुद्धीमान अभ्यासू विचारवंत लोकांनी हिंदू राष्ट्र विरोधी अभियान चालू केले आहे. ■ ■

लेखांक १३८



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

# आमची गर्दी नसेल तर तुमची खुर्ची नसेल : ब्राम्हणवादी स्त्री नेतृत्वाला आव्हान

आम्ही सतरंज्या उचलणारी गर्दी नाही, आम्ही नेतृत्व आहोत, ज्यांची लढाई त्यांची अगुआई, ही आहे पन्नास वर्षांनंतरची बहुजन, वंचित समूहा ची मागणी...

या लेखात काही गोष्टी समजून घेऊ या.... संयुक्त राष्ट्र घोषित अजेंड्यानुसार स्त्रियांच्या स्वायत्त चळवळीची घोषणा 1975 मध्ये झाली. तेव्हा पहिली स्त्री मुक्ती परिषद 1975, मार्च, नागपूर आयोजक - शालिनी कोठारी, बिंझाणी महिला महाविद्यालय उपस्थिती - गेल ओमव्हेट, सीमा साखरे, रूपा कुलकर्णी, कुमुद पावडे, नलिनी सोमकुंवर, नीलम गोऱ्हे, शीला पाटील, लता प्रतिभा मधुकर इत्यादी. पुण्यातील पहिली स्त्री मुक्ती परिषद आयोजक - स्त्री मुक्ती संघर्ष परिषद प्रमुख नेतृत्व - इंदुताई पाटणकर, लीलाताई भोसले, गेल ओमव्हेट उपस्थिती - बायजा संपादक मंडळातील सर्व जणी, शारदा साठे, छाया दातार इत्यादी कॉ. इंदुताई पाटणकर यांच्या स्त्री मुक्ती संघर्ष या संघटनेच्या नावामध्ये व परिषदेच्या नावामध्ये जे साधर्म्य सुरुवातीला दिसते आहे, ते आपल्याला नंतर दिसत नाही. त्यातील संघर्ष शब्द काढून फक्त स्त्री मुक्ती परिषद त्यांनी आपल्या स्त्री मुक्ती संघटन शब्दाशी जोडले.

कारण त्यांचा मुख्य उद्देश संघर्ष नसून फक्त जागृती एवढाच असल्याने त्यांनी भर नाटक व गाणी माध्यमातून स्त्री मुक्ती संघटनेचे जाळे पसरविणे होते. त्यामुळे नेतृत्व मुंबईतील लाल निशाण पक्ष व स्त्री मुक्ती संघटना व डाव्या विचारसरणीतील ब्राम्हण जातींतील स्त्री नेतृत्वाकडे ठेवण्यात त्यांना यश आले. त्यातून विघटन करून छाया दातार यांनी स्त्री उवाच संस्था स्थापन केली. त्यात एक दलित लेखिका सोडल्या तर सर्व ब्राम्हण जातीतील उच्च वर्गीय नोकरदार, व्यावसायिक, लेखिकांचा तो मंच होता. लायब्ररी, डोक्युमेनतेशं, मासिक काढणे, आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा करणे असे एकूण स्त्री उवाचचे काम सुद्धा सोहळे, उत्सव, जत्रा त्यातून निधी गोळा करणे असे स्वरूप असल्याने तळागाळातील स्त्रियांचे नेतृत्व तयार होण्यापेक्षा मुंबईतील नेतृत्व प्रमुख व त्यांच्या नेतृत्वाखाली इतर गावात शाखा व तेथे सुद्धा स्थानिक तथाकस्थित वरच्या जातीकडे नेतृत्व असे स्वरूप दिसते. एकूण काय की ही परिषद स्त्री मुक्ती संघटनेची असती तर त्यांच्या मूळ रचनेतच पहिले इंदुताई पाटणकर, लीला ताई भोसले यांच्यासारखे (ग्रामीण) ब्राम्हणेतर (मराठा) नेतृत्व डावलून स्वतःचे नेतृत्व उभे केले गेले. तर हम सब एक है, ऐवजी हम ब्राह्मण जाती की महिला एक है, असे एकूण नेतृत्व गेली पन्नास वर्षे आपल्यानंतरचे विविध जाती, धर्मातील नेतृत्व उभे करण्यास असमर्थ ठरले. ज्या इतर जातीतील स्त्रिया विविध चळवळीमध्ये नेतृत्व करत होत्या त्या सर्व यांच्या नेटवर्कचा भाग राहिल्या. कारण त्यांचे प्लॅटफॉर्म मुलगी झाली हो, हुंडा नको बाई आणि गीतद्वारे जागृती यासाठी या नेटवर्कचां त्यांना उपयोग झाला. खरोखर संघर्षात जमिनीवर असणाऱ्या कष्टकरी, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त, मुस्लिम, ख्रिस्ती, बौद्ध, दलित, वंचित समूहाचे या संघटनेत प्रतिनिधित्व नाही. त्यामुळे ही जी परिषद आहे ती महाराष्ट्रातील ज्या स्त्री संघटना व सहयोगी पुरुष संघटना मध्ये ब्राम्हण व ब्राम्हणवादी यांना नेतृत्व व समविचारी( दलित) समरसता वादी स्त्री पुरूषांना टोकन प्रतिनिधित्व दिसून येईल.या दोन्ही संघटनांमध्ये मराठी व इंग्रजी भाषा वापरली जाते. हिंदी भाषा तिथे फार वापरली जात नाही. गेल्या पन्नास वर्षात यांच्या संघटनेचे ऑडिट करून किती मुस्लिम, ख्रिस्ती, बौद्ध, दलित, आदिवासी, भटके विमुक्त, वंचित समूहाच्या स्त्रिया जुळल्या व किती नेतृत्व उभे राहिकेव्याचे ऑडिट करायला हवे. कारण अशा एकूणच डाव्या संघटनांमधील आरएसएस चेहरा असणाऱ्या या परिषदेमध्ये आज जी गर्दी आली आहे त्यांनी विचार करावा की ही परिषद कोणाच्या बाजूने आहे? मनुस्मृती नको, संविधान हवे असा नारा असला तरी आतून यांना संविधान आधारित क्रांती नको आहे. तर भाजपचा सॉफ्ट अजेंडा आणत डाव्यातील ब्राम्हणवादी सत्तेत आणण्याचे ध्येय आहे. खरी लढाई गोळवलकर, सावरकर, भागवत, जोशी वादी आणि साठे दातार केतकर वादी यांच्यातील ही नेतृत्व स्पर्धा आहे. आपले संघर्ष आणि आपल्या वेदना, आपले विस्थापन, आपले उच्चाटन, आपला चिखल, आपल्या आत्महत्या यांच्याशी त्यांचे काही देणे घेणे नाही.



कचरा वेचक संघटना बनवतील पण कचऱ्याच्या पेटीत हात न घातलेली बाई त्यांच्या वतीने बोलेल, जिने आयुष्यभर शेतीत काम केले नाही ती शेतीच्या प्रश्नावर बोलेल, जिला कधी विस्थापनाची झळ लागली नाही ती त्यांच्या वतीने बोलेल, असे आणि अशाप्रकारचे यांचे नियोजन आहे. त्यातून कुणाचा टक्का कायम पक्का आणि कुणाला द्यायचा छोटा टक्का असे सर्व हिशोब करून या संघटना उभ्या आहेत. त्या चळवळी नाहीत आणि त्या महाराष्ट्रातील 82 टक्के स्त्री संघटनाचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. हा एक सोहळा आहे. यात घरचे लोक पण वक्ता म्हणून निमंत्रित आहेत. स्त्रियांच्या चळवळीत पुरुष वक्ते बोलवताना पण त्यांना कुमार केतकर, संजीव चांदोरकर (ब्राम्हण पुरुष मित्र) आठवले. पण या संपूर्ण चळवळीत घरदार झोकून दिलेल्या डॉ. भारत पाटणकर किंवा जे अर्थतज्ञ म्हणून प्लॅनिंग कमिशन मध्ये होते, स्त्रिया आणि दलित, वांचित समुदायातील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्यासाठी फेलोशिप विद्यापीठात लागू केली. अशा भालचंद्र मुणगेकर यांचे किंवा स्त्रियांमध्ये अर्थतज्ञ डॉ. विभूती पटेल, यांच्या सारख्यांची नावे यांना आठवली नाही. किंवा जी सुचवली ती ऐनवेळी संपर्क करून ते आता येऊ शकत नाही असे बहाणे करत डावलून टाकण्यात आले.

तसेच मंचावर अन्याय विरुद्ध संघर्ष करणाऱ्या पीडित, शोषित, एकल महिलांचे प्रतिनिधित्व नाही. ज्यांच्यावर हिंसाचार झाका त्यांच्या सक्षमीकरणाचा दावा करणे सोपे आहे. कारण ज्या अशा अन्यायाविरुद्ध लढत सक्षम झाल्या. त्यांच्यापैकी एकीला सुद्धा मंच देण्यास ही परिषद तयार नाही, नाकाम ठरली आहे. या पार्श्वभूमीवर जी खरी विविध समुहांतील स्त्रियांनी उभी केलेली स्त्री चळवळ आहे तिच्या वतीने आम्ही आमचे कार्यक्रम लवकरच घोषित करणार आहोत. शूद्र, अतिशूद्र आदिवासी, भटके विमुक्त, अपंग, उपेक्षित यांना जी परिषद बाहेर ठेवते ती संविधानाचे नाही, मनुस्मृतीचे पालन करते. म्हणून आम्ही भारताचे लोक असणाऱ्या 82 टक्के स्त्रिया ठासून सांगतो की मनुस्मृती नको संविधान हवे, हा फक्त नारा नाही. आमच्या जीवनाचे ध्येय आहे.... ■ ■



लता प्रभा मधुकर
मो. 9922320338

# संयुक्त राष्ट्रांचा ‘जागतिक ध्यान दिवस’ 21 डिसेंबर रोजी प्रथमच साजरा



मानसिक व भावनिक आरोग्य, जागतिक शांतता आणि सुसंवाद यांना चालना देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी 21 डिसेंबर हा ‘जागतिक ध्यान दिवस’ (World Meditation Day) म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे. हा दिवस वर्षातील सर्वात लहान दिवस (अयन दिन) असून अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचे प्रतीक मानला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने 6 डिसेंबर 2024 रोजी यासंबंधीचा ठराव मंजूर केला. या ठरावाला भारताने सक्रिय पाठिंबा दिला असून, ध्यान आणि योगाच्या परंपरेमुळे भारताने या उपक्रमात जागतिक भागीदार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**ध्यानाचे महत्त्व अधोरेखित :-** या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे ध्यानाचे मानसिक, भावनिक व सामाजिक फायदे जगभर पोहोचवणे. ध्यानामुळे मानसिक स्पष्टता, भावनिक संतुलन, तणावमुक्त जीवनशैली आणि आंतरिक शांतता साध्य होते, असे संयुक्त राष्ट्रांनी स्पष्ट केले आहे. तसेच वाढते तणाव, संघर्ष आणि असहिष्णुतेच्या पार्श्वभूमीवर ध्यान हे जागतिक शांततेचे प्रभावी साधन ठरू शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. 2024 ची थीम या वर्षासाठी ‘जागतिक शांतता आणि सुसंवादासाठी ध्यान’ (Meditation for Global Peace and Harmony) ही थीम निश्चित करण्यात आली आहे. जगभरात उपक्रम, जागतिक ध्यान दिनानिमित्त विविध देशांत सामूहिक ध्यान सत्रे मानसिक आरोग्याविषयी जनजागृती कार्यक्रम शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. या माध्यमातून लोकांना शांततेचा, संयमाचा आणि आत्मचिंतनाचा अनुभव घेण्यास प्रवृत्त केले जाणार आहे. भारताची विशेष भूमिका योग आणि ध्यानाची प्राचीन परंपरा लाभलेल्या भारताने या ठरावाला पाठिंबा देत जागतिक स्तरावर मानसिक आरोग्य आणि शांततेचा संदेश देण्याची भूमिका बजावली आहे. यापूर्वी आंतरराष्ट्रीय योग दिनाप्रमाणेच, जागतिक ध्यान दिवसातही भारताची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. मानसिक आरोग्य, शांतता आणि मानवतेच्या सुसंवादासाठी संयुक्त राष्ट्रांचा ‘जागतिक ध्यान दिवस’ हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ■ ■

■ बसौसे ■

“ प्रेमाची शिकवण लहान मुलांकडून फार छान शिकता येते. ”



# जीवन प्रवास - साठी ते काठी

**सहज आठवले म्हणून हात लिहिण्यास तयार झाले, कारण मी माझ्या जीवनाचे साठ वर्षे 05-01-2015 रोजी पूर्ण केली. परंतु सरकारी नोकरीच्या नियमानुसार निवृत्तीची तारीख महिन्याचा शेवटचा दिवस असतो, त्यामुळे माझी निवृत्ती दिनांक 31-01-2015 निश्चित झाली.**

मी माझी नोकरीची सुरुवात वयाच्या 21व्या वर्षी केली, कारण शिक्षण घेण्याचे कारणच नोकरी मिळवणे हेच माझे ध्येय होते. 11 वी मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर थोडे बरे, पण फारसे चांगले गुण न मिळाल्यानेही घरच्यांचा आग्रह होता की पुढील शिक्षण विज्ञान शाखेतूनच घ्यायचे. त्यामुळे कॉलेजची निवड करताना कमी फी आणि सरकारी मान्यता असलेली शिक्षणसंस्था हे प्राधान्य होते. म्हणून विज्ञान संस्था, नागपूर मध्ये माझे नाव पहिल्याच यादीत लागले, आणि दुसरा विचार न करता मी प्रवेश घेतला. माझे वडील श्री. सखारामजी हे वायूसेनेतून बॉण्ड करार पूर्ण करून कन्हान येथे खंडेलवाल फॅरो ॲलॉयज (KFA) येथे नोकरीस लागले. आमचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण कामठीच्या इंग्रजी माध्यम शाळेत झाले. कन्हान हे गाव एकेकाळी उद्योगनगरी म्हणून ओळखले जायचे. राष्ट्रीय महामार्ग व रेल्वे सेवा गावाला सोयीस्कर असल्याने नागपूरला ये-जा करणे सोपे होते. मासिक रेल्वे पास काढून कॉलेजला येणे-जाणे सहज शक्य झाले, जरी प्रवासाचा वैताग यायचा. पण आयुष्याची धडपड, काहीतरी करण्याची इच्छा, आणि मिळालेल्या चांगल्या मित्रमंडळींचा आधार यामुळे कॉलेज शिक्षणाचा प्रवास पुढे चालला. पहिल्याच वर्षी झटका बसला – वार्षिक निकालात गणितात नापास! बाकी सर्व विषयांत चांगले गुण असल्याने कायमस्वरूपी नापास होण्यापासून दिलासा मिळाला आणि 'ATKT' द्वारे द्वितीय वर्षात प्रवेश मिळाला. हिवाळी फेरीत गणितावर लक्ष केंद्रित करून उत्तम गुणांनी पास झालो. मात्र द्वितीय वर्षात वार्षिक परीक्षेत अपयश आले, एक वर्ष वाया गेले आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. तरीही हिम्मत न हरता पुन्हा अभ्यास सुरू केला. आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शिकवणी वर्ग घेण्यास सुरुवात केली. महिन्याला 25 रुपये मिळवण्यासाठी दररोज 6 कि.मी. सायकलने प्रवास करावा लागायचा. अखेर द्वितीय वर्षात यश आले, जरी इच्छित दर्जाचे नव्हते. आता शिक्षणात अडथळा आणणाऱ्या परिस्थितीवर मात करणे आवश्यक भासले. पालकांना विनंती करून कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहण्याची परवानगी घेतली. त्यानुसार नावनोंदणी झाली आणि पुढचा प्रवास सुरू झाला. हॉस्टेलमध्ये नियमित अभ्यास सुरू झाला पण मनात नोकरीच्या विचारांनी घर केले होते. बँक भरतीच्या जाहिरातींची बातमी मिळताच प्रयत्न सुरू केले. माझे थोरले बंधू बँकेत कार्यरत असल्याने त्यांचा प्रभाव आणि मार्गदर्शन मिळाले. सुदैवाने पहिल्याच प्रयत्नात सिंडिकेट बँकेच्या भरती परीक्षेत यश मिळाले. त्या काळात आणीबाणी लागू होती, तरीसुद्धा प्रशिक्षण मेसूर येथे मिळाले. आई-वडिलांसह मेसूरला गेलो. भाषेच्या अडचणी असूनही प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. परत आल्यावर लगेच कॉलेज परीक्षांचा हंगाम सुरु झाला. तयारी कमी असल्याने निकाल अपेक्षित नव्हता, तरी धाडसाने परीक्षा दिली. परीक्षा संपताच नोकरीवर रुजू होण्याचे पत्र आले आणि 19-04-1977 रोजी लोणावळा येथे रुजू झालो. काही काळानंतर बँक ऑफ इंडियाच्या भरतीसाठी निवड झाली आणि 07-10-1977 रोजी काटोल येथे रुजू झालो. काळ पुढे सरकत गेला, बदल्या, पदोन्नती आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पार करत 31-01-2015 या दिवशी निवृत्तीचा दिवस उजाडला. पुण्यात सिंडिकेट बँकेत नोकरी सुरू करून आणि तेथेच बँक ऑफ इंडियेतून निवृत्त होणे – हा जीवनातील सुंदर योगायोग होता. साठ वर्षांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर निवृत्तीनंतरचे आयुष्य नव्या अनुभवांनी समृद्ध झाले. नागपूरला परत आल्यावर जेष्ठ नागरिक म्हणून जीवनाचा नवा टप्पा सुरू झाला. मुला-मुलींची लग्ने, नव्या घरांत वास्तव्य आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्यावर समाजासाठी काही करण्याची इच्छा बळावली. मी बहुजन हिताय संघ, लष्करीबाग, नागपूर येथे आजीवन सदस्यत्व घेतले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशनशीही संलग्न झालो. पेंशनर्स संघटना, वाचन आणि लेखन यांचा छंद जोपासत आजही जीवन प्रवास सुरु आहे. आता 70 वर्ष ओलांडली असून 05-01-2026 रोजी 71 वर्ष पूर्ण होणार आहेत. आरोग्याच्या अडचणी व परिवाराच्या वाढत्या अपेक्षा यांना सामोरे जात स्वतःला फिट ठेवण्याचा प्रयत्न चालूच आहे.जीवन जगणे हे जितके कठीण तितकेच परिश्रमाचे आहे.

आशा ही जीवन आहे, आणि जीवन हीच आशा आहे.

सगळ्यांना समाधानी ठेवणे शक्य नसले, तरी समतोल राखणे हेच कौशल्य असते. रात अभी बाकी है... बात अभी बाकी है! ■ ■




बिपीन. स. गजभिये
झिंगाबाई टाकळी, नागपूर

# सेवाभावी देवराव सखारामजी रायपुरे

**बाजारगाव, कोंढाळी एकेकाळी त्या गावात लभान (बंजारा) लोक राहायचे. त्यावेळी त्यांचाच बोलबाला होता. काही मराठा लोकांची घरी सुद्धा होती. अशा या लहानशा गावात माझ्या सासऱ्यांचा, म्हणजे देवराव सखारामजी रायपुरे यांचा जन्म झाला. त्यांचा जन्म जवळपास 1939 च्या आसपास असावा आणि स्मृतिदिन 13 डिसेंबर 1991. जन्म आणि मृत्यू यांच्यातील प्रवास, त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त सांगावसे वाटते.**

आई-वडिलांना एक मोठी मुलगी आणि तीन मुले असा त्यांचा परिवार होता. सखारामजी रायपुरे, माझ्या सासऱ्यांचे वडील हे पहेलवान होते. एकदा तेथील रहिवासी (लभान) लोकांनी त्यांना म्हटले, 'सखाराम, तू हे मोडलेले झाड उचलून दाखवशील तर तुला कोतवाल बनवू आणि सोबत एक जमिनीचा लहानसा तुकडा, ज्याला डुंग म्हणतात, 'कोतवाल डुंग' ते देऊ.' ते पहेलवान असल्यामुळे पडलेले भारी झाड उचलून कोतवाल बनण्याचा मान त्यांनी मिळविला आणि सोबत ते डुंगही मिळाले. मिळालेल्या जमिनीचा तुकडा आणि गावातील मोलमजुरी करून त्यांचा उदरनिर्वाह चालायचा. तीन भावांमध्ये माझे सासरे मोठे. गरीब जरी होते, पण स्वाभिमानी आणि मनाने मोठे होते. त्या गावात मराठ्याच्या वावरात एक विहीर होती. इतर जातीतील बरोबरीच्या मुलांबरोबर तेही त्या विहिरीत पोहायला गेले, पण त्या मराठ्यांनी माझ्या सासऱ्यांना जातीच्या नावावरून बेदम मारहाण केली. त्या अपमानाचा खोलवर परिणाम त्यांच्या मनावर झाला. ते घरी कोणालाही न सांगता बाजारगाव कोंढाळीवरून एका संत्र्याच्या बंडीच्या मागे पायी-पायी नागपूरला आले. नागपूरला आल्यावर पोटाला भूक आणि तहान लागली होती. संत्रा मार्केटमधील टिपले नावाच्या तेली समाजाच्या हॉटेलवाल्याकडे काम मागितले. हॉटेलवाल्यांनी विचारपूस केल्यानंतर जेवण आणि प्यायला पाणी मिळाले. पोटाची तहान आणि भूक शांत झाल्यावर कधी झोप लागली, कळलेच नाही. दुसऱ्या दिवसापासून तिथेच राहून काम करू लागले. कालांतराने त्यांचा पूर्ण परिवार नागपूरातच आला. मोलमजुरी करून जीवन चालवत होते. कालांतराने चुलत मोठ्या भावाच्या माध्यमातून एग्रीकल्चरमध्ये क्लास फोरचे काम मिळाले. पण तिथे काय झाले की चोरी कोणी तरी केली, नाव मात्र माझ्या सासऱ्यांवर आले आणि ती नोकरी गमवावी लागली. नंतर एम्प्रेस मिलमध्ये काम मिळाले. वरच्या पोस्ट असलेल्या साहेबांनी एका कर्मचाऱ्याची काही कारणावरून बेइज्जती केली. त्यात माझ्या सासऱ्यांनी त्या साहेबाला जाऊन थापड मारली आणि त्या साहेबांनी वरच्या साहेबांकडे तक्रार करून तिथूनही नोकरी सुटली. नंतर काही दिवसांनी नागपूर महानगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून काम मिळाले. तिथला जमादार थोडासा समजदार असल्यामुळे नाला साफसफाईचे काम होते ते करू देत नव्हता. काही दिवसांनंतर जमादाराची बदली झाली आणि दुसरा जमादार आला. तो नाले साफ करायला लावेल, त्याआधीच ती नोकरी सोडली. नंतरचा प्रसंग असा की चंदननगरमध्ये किरायाने राहत असताना तिथे एक रेशनचे दुकान होते (कंट्रोल). तो दुकानदार ग्राहकांना पर्याप्त राशन वाटत नव्हता. त्याची तक्रार करायची कोणाची हिंमतही होत नव्हती. अशातच माझ्या सासऱ्यांनी कंट्रोलवाल्याच्या दुकानात जाऊन, 'तू ग्राहकांना बरोबर धान्य का वाटत नाहीस?' म्हणून त्याची पिटाई केली. पोलिस तक्रार होऊन शेवटी त्यांना जेलमध्ये जावे लागले. इकडे माझ्या सासूबाई दुसऱ्या मुलाच्या डिलिव्हरीसाठी मेडिकलमध्ये ॲडमिट झाल्या. ज्या दिवशी मुलगा झाला, त्या दिवशीच तिकडून माझ्या सासऱ्यांना जेलमधून सुटका मिळाली. एक मोठी मुलगी आणि लहान मुलगा असा लहानसा परिवार सोबत चंदननगरला किरायाच्या घरात राहू लागले. ते फळे विकायला जायचे. तेवढ्यावर घर चालत नव्हते, म्हणून माझ्या सासूनाही पैसा कमावण्यासाठी बाहेर पडावे लागले आणि त्या डोक्यावर टोपली घेऊन फळ विकायला लागल्या. दोन्ही मुले शाळेत जायला लागली. ते मुलांच्या शाळेविषयी खूप जागरूक असायचे. 'मी शाळा नाही शिकलो, पण माझी मुले शाळा शिकली पाहिजेत,' असे ते म्हणायचे. मुलीला मॅट्रिकपर्यंत शिकवून तिचे लग्न केले. राहिला मुलगा, तो शाळेत बरोबर जातो किंवा नाही याकडे त्यांचे विशेष लक्ष असायचे. शाळेत जाऊन गुरुजींना मुलाविषयी विचारपूस करायचे. चंदननगरमध्ये नाल्याच्या काठावर राहत असताना आजूबाजूला जुवा, गांजा, सट्टा, दारू, झगडे-भांडणे अशा प्रकारचे वातावरण होते. तिथे राहून माझा मुलगा बिघडेल याची त्यांना चिंता वाटायची. त्यामुळे चंदननगर सोडून आशीर्वादनगरला राहायला आले. तिथे मुलाला छोटा ताजबागमधील सक्करदरा विद्यालयात (आत्ताचे भाऊसाहेब सुर्वे) टाकले. इकडे मुलगा शाळेच्या नावाने घरी निघायचा, पण बाहेर गेल्यावर शाळेला दांडी मारायचा. काही दिवसांनंतर वडिलांनी शाळेत जाऊन गुरुजींची विचारपूस केल्यावर कळले की हा पठ्ठा दोन महिन्यांपासून शाळेतच नाही गेला. घरी आल्यावर मुलाला दम येईपर्यंत झोडपले आणि 'पुन्हा कधी शाळेला दांडी मारशील तर खबरदार!' असे म्हटले. नंतर मुलाला काही चांगल्या, प्रामाणिक ओ.बी.सी. मुलांची संगत लागली. त्यांच्याकडे अभ्यास करायला जायला लागले. सासरे मुलाला म्हणायचे, 'मी शिकलो नाही म्हणून काय झाले? पण तू शिक पोरा. मी जरी फळ विकत असलो तरी तू साहेब झालास पाहिजेस. मुलगा व्हावा असा गुंडा किंवा तिन्ही लोक झेंडा असा नालायक निघाला तर तो आमच्या कोणत्या कामाचा?' ते स्वतः जे करू शकले नाही, ते आपल्या मुलात बघायचे. त्यांना आपल्या मुलावर खूप गर्व वाटायचा. आशीर्वादनगरला असताना जास्तीत जास्त आजूबाजूला आपलेच लोक राहिले पाहिजेत म्हणून ओळखीच्या लोकांकडे जाऊन झोपड्या बांधायला लावायचे. संजय गांधी झोपडपट्टीत (स्लम एरिया) चंदननगरच्या तीन-चार लोकांना आणून बसवले. ते रोखठोक बोलायचे, पण खरे बोलायचे. कोणाला त्यांचा रागही यायचा. बऱ्याचशा मुला-मुलींची लग्ने त्यांनी जोडून दिली आणि ती यशस्वी झाली. त्यांना आधीच अस्थमाची बिमारी होती. बाबांना 53 वर्षांचे असताना पक्षाघात झाला. औषधे सुरू होती, पण आराम लागत नव्हता. तेव्हा तेवढे समजतही नव्हते. गरिबी असल्यामुळे उपचार करायला पुरेसा पैसाही नव्हता. वडिलांचे चांगल्या प्रकारे सेवा व्हावी म्हणून मुलाने आईचे फळ विकायला जाणे बंद केले आणि स्वतः दहावी-बारावीच्या मुलांचे शिकवणी वर्ग घेऊन घर चालवत वडिलांचा उपचार करायचा. स्वतः मुलाने तेल मालिश करून जेवढे दिवस वडील जिवंत राहिले, तेवढ्यात खूप सेवा केली. जिथे कोणी औषध सांगितले, तिथे घेऊन जायचे. त्यांना आपल्या मुलाला साहेब झालेला पाहायचा होता, पण निसर्गाला ते मान्य नव्हते. शेवटी 13 डिसेंबर 1991 ला त्यांची प्राणज्योत मालवली. दोन वर्षांनंतर म्हणजे 1993 मध्ये मुलाला पी.एस.आय. या पदावर बी.एस.एफ. मध्ये नोकरी लागली. पण मुलाची सरकारी नोकरी आणि त्यातही साहेब झालेला पाहण्यासाठी वडील जिवंत नव्हते. आज त्यांचा मुलगा डेप्युटी कमांडंट या पदावर असून देशाची सेवा करत आहे. 13 डिसेंबर, बाबांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या दोन्ही नातू परिक्रमा, संचयी, पत्नी मंजुळाबाई, मुलगी मीना गाणार, मुलगा प्रदीप, सुन सुनंदा व संपूर्ण रायपुरे परिवारातर्फे त्यांना विनम्र अभिवादन! ■ ■






सुनंदा रायपुरे
मो. 8806921951

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

बहुजन सौरभ

### चळवळ मागे राहिली!

चळवळ मागे राहिली
असं बोलत बोलत
आम्ही किती त्यात हातभार लावला
हेच विसरलो
डॉ.बाबासाहेबांनी धम्म दिला
पण आम्ही मनापासून बुध्द किती स्विकारला
हेच विसरलो
तरुणांनी विचारधारेशी बेईमानी केली
असं म्हणत म्हणत ओंठ आमची थकली नाही
पण आमची पोटची पोर किती आंदोलनात आली
हेच विसरलो
फुले,शाहू, आंबेडकरांचा नारा लावून घसा कोरडा केला
पण त्यांच्या विचारांना आचरण्यात आणणे
हेच विसरलो
लोकांच्या मुलां मुलींना चळवळ सांगत बसतो
पण घरातील मुला मुलींना धर्मांतरणाची जाणीवही करुन दिली नाही
हेच विसरलो
जिजाऊ, रमाई, सावित्रीबाई आयुष्याचे खरे योद्धा ओरडून ओरडून सांगतो
पण दुसऱ्या मुलींच्या प्रती मायेची भावना जोपासावी
हेच विसरलो
प्रत्येक संघटन फालोवर तयार करण्यात व्यस्त आहेत
पण प्रत्येक व्यक्तिला लीडर म्हणून घडवणे
हेच विसरलो
हेच विसरलो

**मिनल शेंडे**

### आम्ही भारताचे लोक

पूर्व,पश्चिम,उत्तर,दक्षिण,
धर्म अनेक
चाली रीती, बोली, भाषा
पंथ अनेक
सर्व एकत्रो नांदतो, तरी
रूढी, परंपरा अनेक
आम्ही सर्व भारत मातेचे,लोक
सैनिक जातो शत्रू संगे लढण्या
सर्व प्रांते होऊन ऐक
कुणी, कुणाचा करी ना द्वेष
भूमातेचे आहोत आम्ही लेक
लढतो आम्ही सर्व मिळून अनेक
आम्ही सर्व भारत मातेचे लोक
धर्म, पंथ, रूढी, परंपरा
सण, त्योहार, आहे अनेक
मिळून, मिसळून, सर्व महापुरुषांच्या
जयंती ला होतो एक
आहोत आम्ही भारताचे लोक
जाती, धर्म, विसरून आम्ही
लग्न, समारंभात,
होतो ऐक
शाळा, कॉलेज, ऑफिस मध्ये
करितो काम नेक
आहोत आम्ही भारताचे लोक
धन्य त्या आंबेडकर ला
संविधान धर्म ग्रंथ
लिहून ठेवला ऐक
त्यात सर्वांसाठी कलमे अनेक
संविधानाने सर्वांना जोडून
ठेवले ऐक
आहोत आम्ही भारताचे लोक

**सुरेखा ताकसांडे**

### बाबासाहेब

अखंड अंधाराचा अजस्र विळखा
माझ्या व त्यांच्याही आयुष्याला पिढीजात मुळामुळातून पोसत किती तरी शतके.
तुमच्या गुरूनीही खणून पाहिली ही गुलामगिरीची पाळेमुळे निर्मिकाच्या नेमस्त खणतीने पण फक्त.. काळोखावर वार केला पणतीने. तुम्ही ही तिरिप जपली मग हिरिरीने. हिम्मतीने.
ढवळली मग तुम्ही वेद पुराणे प्रतिक्रांतीची बिळे उसवित राहिलात, उलगडीत राहिलात तुम्ही पुरूषसुक्ताची आदिम पिळे,
सोलत राहीलात प्रेषित, परमेश्वर ते परवरदिगर. तपासत राहीलात तुम्ही अर्वाचिन रानडे, गांधी, जीनापासून मार्क्सपर्यंत महात्म्यांची वादळेही.
तुम्ही तासत गेलात ह्या भुमिवरील शोषणाची पिलावळे व गोतावळे अन् उघडी पाडली भयभ्रमाची मायावी तत्वज्ञान वारूळे.
तुम्हाला हेलावत होते समस्ताचे दुःख आभाळ व वर्णव्यवस्थेतील अमानुष विषमळे. त्वेशाने अन् उद्वेगाने मग तुम्ही प्राशले चवदार तळे. त्या ओंजळभर पाण्याहूनही पावन जाहली तुमची ही उजेडाकडची पाउले.
पण संपत नव्हते अंधःकाराचे अधिराज्य सरले जरी ब्रिटिश साम्राज्य, कुटिल व्यवस्था तर तुमच्या धिक्काराची मिजास बाळगणारी कुद्ध.
तुम्ही मुकनायक. निधड्या मनाने चालत बहिष्कृताचे प्रबुद्ध भारत करण्याचे ध्येय जोपासत. अविरत.
स्वतंत्र नवउषःकालात मग तुम्ही शब्द लिहीले समतेचे ममतेचे वंचितांच्याही हुंकारांचे. स्वातंर्त्य समता बंधुता या त्रयी सह न्याय.. या समस्तांच्या प्रतिबिंबीत संवेदनेचे असे संविधान शब्दभान ..... भारतासाठी व भविष्यातल्या महाभारतासाठीही
तथागतांचा सोनउजेडही तुम्ही घासून पुसून लखलखीत करून दिलाय आम्हासाठी त्याने प्रकाशून गेलेय क्षितिज व दिशापल्याडही आता.
तात. तुमची करुणेची कुसललस्स उपसंपदा सय माझ्या रंध्रारंध्रात.
पण आता तर त्यांनाही तुम्ही त्राता वाटू लागलायत प्रातः संस्मरणीय वगैरे ही त्यांच्याही मनाची कवाडे उघडोत उजेडोत एवढेच...
तुम्ही तर महाकारूणीकाच्या धम्मकायेतील अस्सल भरजरी महासत्व बोधिचित्त आम्ही तर विद्ध निबध्द.. पंचशिलकटिबद्ध तुमच्या बोधिसत्वास अभिवादीत फक्त.

**सुविचार मेश्राम**

### माणुस दुष्ट होत आहे

माणूस दुष्ट होता अन आहे
कालचा पण अन आजचाही
संविद्यानाच्या 340 कलमाचा
अंमल नाही केला
341.342 चा बॅकलाग उभा केला
खाजगीकरणाच्या बदल्यात संधी नाकारव्याची युक्ती
कोसोदूर सारली शुद्र, अतीशहांची मुक्ती
माणूस दुष्ट होता अन आहे........
घटनाकारास आस्वस्त करणारा हिंदू कोड बील
दिला शब्द न पाडणारा
दुष्टाच्या मकडजालात स्त्री अन मागास वगाचा बळी घेणारा
निर्मात्यास राजीनामा देण्यास भाग पाडणारा
माणूस दुष्ट होता अन आहे..........
स्वतंर्त्य मतदार संघ दलीत आदीवासी कल्याणाचा
मिळवलेल्या दोन मताच्या अधिकाराच्या विरोधात सत्याग्रह करणारा
माणूस दृष्ट होता अन आहे.........
बुध्द धम्मीयांच्या विरोधात इतरांना आपल्या कंम्पूत घेणारा चमचे, दलाल, भडव्यांना विरोधात उभा करणारा,
समता ऐवजी समरसता सगणारा
माणूस दुष्ट होता अन आहे..
उच्च विद्याविभूषीतांना दगा फटका करणारा
EWS फोटा, Lateral Entry ने नियुक्त्या करणारा
माणूस दुष्ट होता अन् आहे........
सर्वभौम धर्मनिरपेक्षता सामाजिक, लोकशाही, बंधुता, न्यायू आणि समता
जगातील सवगि सुंदर अशी घटना
राजेशाही, संगोल, मनुवाद हुकुमशाहीन परिवर्तन करणारा माणूस दुष्ट होता अन आहे कालचा पती अन आजचाही.

**ऋषीकांत संपतराव लोखंडे**

# ससा आणि बेडूक

**एकदा एक ससोबा नदीजवळील मऊशार गवत खात असताना, नदिच्या पाण्यातून काही बेडकं बाहेर आलीत. इकडे तिकडे बघत असताना त्यांना ससा दिसला. त्याबरोबर त्यातील एक बेडूक सोडून इतरांनी पाण्यात उड्या घेतल्या. क्षणार्धात ते दिसेनासे झाले.**

हे सर्व ससा बघत होता. आपण दिसल्याबरोबर फक्त एक सोडून सर्वांनी पाण्यात कां बरं उड्या मारल्या असतील? आपली भीती वाटली असेल का त्या सर्वांना? मग या बेडकाला कां बरं वाटली नसेल भीती? असे प्रश्न सशाच्या मनात निर्माण झाले. आपल्या मनातील शंका त्या बेडकास विचारावी असं ससोबास वाटलं. पण विचारायचं कसं हा प्रश्न होता. आपण त्याच्याकडे गेलो तर तोही पाण्यात उडी मारुन निघून जायचा. ससा मनात म्हणाला. तो विचार करत बेडकाकडे एकटक बघत राहिला.

बेडूकही सशाकडे एकटक बघत होता. हा ससा आपल्यावर हल्ला करेल म्हणून आपले सवंगडी लगेच माघारी निघून गेले. पण इतका वेळ होउनही हा ससा जागचा हलला नाही. आपल्यावर हल्ला करण्याचे कोणतीही हालचाल त्याच्याकडून घडत नाही. आम्ही समजत होतो तसं हा भीतीदायक दिसत नाही. खरच असं असेल का? असा विचार करत बेडूक सशाकडे एकटक बघत होता. असा बराच वेळ गेला. दोघांनीही काहीच हालचाल केली नाही. एकाएकी ससा जोराने हसला.. हे बघून बेडकास आश्चर्य वाटलं. काहीतरी प्रतिसाद द्यायला हवा म्हणून मग तोही हसला. दोघेही हसत हसत एकमेकांच्या जवळ आले आणि बराच वेळ हसत राहिले.

थोड्योवळाने बेडकाने सशाला विचारलं, काय रे ससोबा, कशासाठी हसतोस तू इतका?

बेडकोबा, तू कशासाठी हसतोस बॉ?

अरे, तू हसलास म्हणून मी हसलो.बेडूक सशाला म्हणाला.

हो का, अरे, तू काहीच करत नव्हतास ना म्हणून मी हसलो. ससा बेडकास म्हणाला. म्हणजे गंमतच म्हणायची. बघ हसण्यामुळे आपण एकमेकांच्या जवळ आलो. बोलू लागलो. माझ्या मनात असलेली तुझ्याबद्दलची भीती गेली.बेडूक सशाला म्हणाला.

अरे, तुझे मित्र कां बरं मी दिसताच नदीत उडी मारुन निघून गेले? सशाने बेडकास विचारलं.

अरे, तू खाशील अशी भीती वाटते बेडकांना.

मग, तुला नाही का वाटली? सशाने बेडकास विचारलं.

वाटली होती. पण मग विचार केला, कुणीतरी सांगितलं म्हणून आपणास ससोबाची भीती वाटते. पण ते खरं की खोटं याची खातरजमा नको का करायला? म्हणून मी मागे राहिलो. बेडूक सशाला म्हणाला. पण समजा मी तुझ्यावर हल्ला केला असता तर? तर, माझ्या मित्रांची भीती खरी ठरली असती. म्हणून मी मागचे दोन पाय पाण्यातच टाकून होतो. तू हल्ला केला असतास तर मी लगेच वळून पाण्यात शिरलो असतो. पण बघ तसं काही झालं नाही. तू मला काहीही केलं नाहीस. सशाची भीती, आम्ही बेडकं उगीचच बाळगत होतो, याची खात्री पटली. तुझ्या रुपाने मला एक नवा मित्र मिळाला. थोडी सावधगिरी बाळगली, स्वत~ खात्री केली की असा फायदा होता बघ. बेडूक म्हणाला.सशाला आनंद झाला.त्या ने बेडकास पाठिवर बसवलं आणि सगळ्या वनाची भ्रमंती करुन आणली. बेडकाने सशाला, नदीचे पाणी ज्या ठिकाणी सर्वात गोड असते ते ठिकाण दाखवलं. ते पाणी पिऊन ससा तृप्त झाला. ■ ■




सुरेश वांदिले

# अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी

**मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा 3 डिसेंबर रोजी 74 वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म 24 ऑगस्ट 1880 रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले.**

त्या ही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या. मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उस्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. या कामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उद्गारले, अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. 1952 साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या 35 कविता असलेला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोद बुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. 'अरे संसार संसार, जसा तवा चुल्यावर, आधी हाताला चटके, तेंव्हा ( मियते) मिळते भाकर, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर, किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर, धरित्रीले दंडवत. यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान धृव तात्यासारखे अढळ आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे 3 डिसेंबर 1951 रोजी निधन झाले. बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन! ■ ■






श्याम ठाणेदार, पुणे
9922546295




## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा राळेगाव जिल्हा यवतमाळ

सामाजिक क्रांतीचे जनक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा राळेगाव जिल्हा यवतमाळ येथे आहे. राळेगाव हे भौगोलिक आदिवासी बहुल भाग आहे. गावच्या मुख्य रस्त्यावर पुतळा असून बाजूला तहसील मुख्य रस्त्यावर बाजार व भरगच्च वस्ती आहे. येणाऱ्या जाणाऱ्याचे आकर्षण पुतळा आहे राळेगावातील सर्व धर्माचे लोक या ठिकाणी बाबासाहेबांना नमन करण्यासाठी येतात. विविध दिनविशेष निमित्ताने अभिवादन करतात.

संवाद मित्र कपिल नारनवरे
मो. 9370773608

# नारा पार्क आरक्षित जागेचे आरक्षण रद्द

**सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करण्याबाबत ना. सु.प्र.सभापती यांना निवेदन**

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटर नॅशनल पार्क बचाव कृती समितीच्यावतीने दि. 19-12-2025 रोजी नागपूर सुधार प्रन्यासचे अधिकारी किरण राऊत यांना निवेदन देण्यात आले. सन 2000 पासून नागपूर सुधार प्रन्यासने सुधार विकास आराखड्यात नारा पार्क 130 एकर जागा आरक्षित केली होती. परंतु ना.सू.प्र.आरक्षित केलेल्या जागेचे भुसपांदन न केल्यामुळे समितीच्या वतीने जागा संपादित करण्यात यावी. याकरिता 2-10-2024 पासून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, नगर विकास विभागाचे उपमुख्यमंत्री व ना.सू.प्र. सभापती यांच्याशी पत्र व्यवहार करून निधी उपलब्ध करून जागा संपादित करावी. या करिता सातत्याने 485 दिवस आंदोलन सुरू आहे. उच्च न्यायालयात अर्ज दाखल करून पार्कची जागा संपादित करून पार्कचा विकास करावा ही मागणीही केली होती.



नागपूर सुधार प्रण्यासाने जमीन संपादन न केल्यामुळे ज्या सुरेशचंद्र सुरी तसेच इतरांनी आरक्षण रद्द करून ती जमीन मुळ मालकांना देण्यात यावी या करिता री पीटिशन दाखल केली होती. 10-12-2025 लां उच्च न्यायालयाने आदेश पारित करून सन 2001 साली महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिलेल्या नारा पार्क 25 वर्षापर्यंत भूसंपादन न केल्यामुळे आरक्षण रद्द करून जमीन मुळ मालकाला परत केल्याचे आदेश दिल्याचे कळले आहे त्याकरिता उच्च न्यायालयाने 10-12-2025 रोजी पारित केलेल्या आदेशाला रद्द करण्याकरिता सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करावी व 130 एकर जमिनीवर नारा पार्क होण्याकरिता निधी उपलब्ध करून पार्क बनवावा ही समितीची व जनतेची मागणी आहे. 25 वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न निकाली काढण्याकरिता सातत्याने वेदप्रकाश आर्य प्रयत्न करीत आहेत. तसेच ॲड. हंसराज भांगे, पुष्पा घोडके, सुधा चौधरी, संघमित्रा रामटेके, उषा बौद्ध, प्रमिला टेंभेकर, सुनील लांजेवार, शेखर पाटील, नरेश महाजन, विजय सुरवाडे निवेदन देण्याकरिता उपस्थित होते.

# आज वधूवर परिचय मेळावा

**नागपूर :** समन्वय समिती नागपूरच्या वतीने विवाहोत्सुक मुली-मुलांचा परिचय मेळावा रविवारी, दि. 21 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उरवेला कॉलनी, छत्रपती चौक जवळ, वर्धा रोड, नागपूर येथे आयोजित केला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात मुली-मुलांना वर-वधू शोधण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे आई-वडील आणि नातेवाईकांना हे कर्तव्य पार पाडावे लागते. मात्र, वडीलांना आवडले तरी आईला नसते किंवा दोघांना आवडले तरी मुली-मुलांना मान्य नसते. परिणामी, लग्नाचे वय वाढते आणि सामूहिक विवाह किंवा नोंदणीकृत लग्न करून घटस्फोटाचा मार्ग अवलंबला जातो. या समस्येवर मध्यस्थ म्हणून समिती 2020 पासून कार्यरत आहे. या मेळाव्यात इंजिनिअर, डॉक्टर, घटस्फोटित पती-पत्नी तसेच सामान्य सर्व प्रकारचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. प्रवेश निःशुल्क असल्याने गर्दी होण्याची शक्यता आहे. रजिस्ट्रेशनसाठी पासपोर्ट साईझ आणि पोस्टकार्ड साईझ कलर फोटो घेऊन कार्यक्रमस्थळी सकाळी 10.30 पर्यंत पोहोचावे आणि 11.30 पर्यंत नोंदणी करावी, अशी विनंती समितीचे केंद्रीय सचिव इंजि. ए. के. पाटील यांनी केली आहे. वधूवर परिचय मेळाव्याचे आयोजन 21/12/25 लानागपूर, 19 डिसेंबर, समन्वय समिती नागपूरच्या वतीने रविवारी (21/12/25) दुपारी 11 वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उरवेला कॉलनी, छत्रपती चौकाजवळ, वर्धा रोड, नागपूर येथे विवाहोत्सुक मुली-मुलांचा परिचय मेळावा आयोजित केला आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे तरुणांना वर-वधू शोधण्याचा वेळच उरत नाही. आई-वडीलांच्या निवडींमुळे लग्नाचे वय वाढले आहे. यावर उपाय म्हणून समिती 2020 पासून मेळावे आयोजित करत आहे.



इंजिनिअर, डॉक्टरांपासून घटस्फोटितांपर्यंत सर्व सहभागी होणार आहेत. प्रवेश मोफत आहे. नोंदणीसाठी पासपोर्ट आणि पोस्टकार्ड साईझ कलर फोटो घेऊन 10.30 पर्यंत पोहोचावे, असे केंद्रीय सचिव इंजि. ए. के. पाटील यांनी सांगितले.

# हुकूमशाही चोर पावलाने येत आहे : अशोक सरस्वती बोधी

**यवतमाळ :** कोणताही हुकूमशहा उजळमाथ्याने सत्तेत येत नाही तो चोर पावलांनी येतो. हिटलर असाच लोकशाहीचे माध्यमाने निवडणूक जिंकून सत्तेत आला. नंतर वांशिक भेदभाव निर्माण करून लोक समर्थन प्राप्त केले. त्यानंतर तो हुकूमशहा झाला. त्याने जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या संकटात लोटले. स्वतःच्या देशाचा आणि स्वतःचाही वाईट अंत करून घेतला. तशीच परिस्थिती सध्या भारतात आली आहे. भारतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मार्गदर्शनाने मोदींची हुकूमशाही चोर पावलाने आली आहे. त्याचा मुकाबला भारतीय जनतेने केला पाहिजे असे प्रतिपादन प्रबोधन यात्रा मार्गदर्शक अशोक सरस्वती यांनी यवतमाळ येथील प्रबोधन सभेत केले.




लॉर्ड बुद्धा विहार सभागृह बस स्टँड यवतमाळ येथे दि. 16 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 3 वाजता बुद्ध विहार समन्वय समिती तर्फे आयोजित बिरासा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष आणि आंबेडकरी विचारवंत दशरथ मडावी यांचे अध्यक्षतेखाली प्रबोधन सभा संपन्न झाली, त्यावेळी मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. दशरथ मडावी यांनी आपल्या भाषणातून हुकूमशाही उलथून टाकण्यासाठी सर्व समाजाने संघटित लढा देण्याचे आवाहन केले. यावेळी नेर परसोपंत येथील शरद मोरे, मीरा मोरे यांनी विचार व्यक्त केले. गोकुलदास आठवले यांनी प्रास्ताविक भाषण केले आणि अशोक दिघाडे यांनी संचालन केले तर डॉ. राजू इंगोले यांनी आभार प्रदर्शन केले. त्या प्रसंगी बुद्ध विहार समन्वय समितीचे वतीने जी पालि भाषा परीक्षा संपन्न झाली, त्यात जे उत्तीर्ण झाले, त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तर जिल्ह्यातून मेरिट मध्ये जे आले त्यांना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. भालचंद्र वानखेडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न विशेष केले. प्रबोधन यात्रेतील ही 22 वी प्रबोधन सभा होती.

28 नोव्हेंबर ला शेंडगाव पासून सुरू झालेली प्रबोधन यात्रा 25 डिसेंबर रोजी जरुड येथे मानसिक गुलामी विरुद्ध परिषदेचे आयोजन करून समाप्त होईल. 31 वर्षापासून संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे वतीने ही यात्रा आयोजित करण्यात येते.

## निवडणूकीत चुकीची माहिती देणाऱ्या सुरेश गुलाबचंद आहुजावर कडक कारवाईची मागणी

**नागपूर :** पार्टीला प्राप्त साक्षी, पुरावा, प्रमाण सुत्राच्या माहिती अनुसार वर्धा नगरपरीषद प्रभाग क्र. 16 व मधील अपक्ष उमेदवार चिन्ह शिलाई मशीन सुरेश गुलाबचंद आहुजा यांनी भरलेल्या नामांकन पत्र दिलेल्या शपथपत्र प्रॉपर्टी आर्थिक बाजू कमी दखलपात्र वा पोलिस स्टेशन (शहर) रजिस्टर कलम 294, 506, 323, 34 तसेच 294, 506, 427 अशा संवेदन गुन्ह्याची माहिती लपवून सुद्धा निवडणुक आयोग व त्यांचे वर्धा जिल्हा निवडणूक यंत्रणा अधिकारी आजपर्यंत चूप बसुन त्याला निवडणूक प्रक्रियाचा प्रचार करुन मतदान सुद्धा करवून येणाऱ्या 21/12/25 रोजीच्या असंविधानिक, गैरकायदेशिर, अध्यात्मिक मतमोजणीच्या प्रक्रियेत सहभागी करण्याच्या बेतात असल्याने सदर उमेदवार व निवडणूक यंत्रणा निर्भय मानणाऱ्या आम मतदार यांची दिशाभुल करीत असल्याने याद्वारे सदर असंविधानिक उमेदवारांची उमेदवारी नामांकन सह शपथपत्र खारीज सोबतच विना विलंब फौजदारी कारवाई करण्याचे राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना प्रार्थना करीत असून दि. 20/12/25 नंतर त्या उमेदवार व त्याच्या वरील सहकार्यास जबाबदार सर्वांवर आम्ही फौजदारी दखलपात्र अपराधाची तक्रार सह याचिका दाखल करणार आहोत.

## राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामध्ये अंनिसच्या वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण



**नागपूर :** उमरेड रोडवरील परसोडी येथे 10 डिसेंबर ते 16 डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना निवासी हिवाळी शिबिरामध्ये श्री निकेतन आर्ट्स कॉमर्स कॉलेज मधील विद्यार्थ्यांकरिता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांना अंधश्रद्धेचे बळी होण्यापासून कसा बचाव करता येईल यावर अनेक वैज्ञानिक प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.यावेळी पाण्याने दिवा पेटविणे, न संपणारे तीर्थ वारंवार काढणे, जळता कापूर हातावर खेळवणे व तो खाणे, दृष्टी भ्रम, ध्वनि भ्रम, भौतिक शास्त्रातील गुरुत्वमध्याचे, केशाकर्षणाने निर्जीव मूर्ती कशी दूध पिते अशा विविध प्रात्यक्षिकांचे सादरीकरण करून सर्वच धर्मामध्ये सांगितलेल्या गोष्टींची विधायक व कृतिशील काल सुसंगत चिकित्सा तरुणांनी करावी असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. राजेंद्र मालोकर यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार व अंगीकार मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. मालोकर यांनी सर्व गावकरी व विद्यार्थ्यांना नशामुक्त भारत अभियानांतर्गत व्यसनमुक्तीच्या सामूहिक संकल्पाचे वाचन केले. कार्यक्रमाला एन एस एस कार्यक्रम अधिकारी प्रा. राजेश कन्हेरे, प्रा. प्रशांत खडतकर, प्रा. अनिता मेश्राम, प्रा. हरले, चैतन्य धुरूगकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थी मानसी शास्त्रकार यांनी केले तर आभार संजना शाहू या विद्यार्थिनीने मानले.

### महत्वाचे

## मुख्यमंत्र्यांकडे बसपाच्या 14 मागण्या

**नागपूर :** बहुजन समाज पार्टीने आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्या सचिवालयाला भेट देऊन त्यांच्याकडे 14 मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यात दीक्षाभूमी स्मारकाला कॉटन रिसर्च व हेल्थची जागा देणे, यशवंत स्टेडियम व अंबाझरीवर आंबेडकर स्मारक बांधणे, नागपूर नगरीचे संस्थापक गोंडराजे बक्त बुलंदशहा उईके यांचे सक्करदरा येथील समाधी स्थळ विकसित करणे, भारतीय संविधानाच्या अंमल बजावणीसाठी प्रत्येक घरात, शाळेत व कार्यालयात अल्प दरात संविधान पोहोचविणे, जिल्हा परिषद व मनपाच्या शाळांना सीबीएससी बोर्डाचे शिक्षण लागू करणे, झोपडपट्टी वासीयांना मालकी हक्काचे पट्टे देणे, भूमिहीनांना जमीन देणे, शिष्यवृत्तीचे मासिक वितरण करणे, नव्याने वस्तीगृहाची निर्मिती करणे, अनुसूचित जाती-जमातीचा बॅकलाग भरणे, महात्मा फुले जनआरोग्य योजना शासकीय व निमशासकीय स्तरावर राबवणे, अनुसूचित जाती-जमातीसाठी स्वतंत्र बजेट ठेवून बजेटचा कायदा करणे, अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण थांबविणे, ॲट्रॉसिटी अंतर्गत नोंद असलेली प्रकरणे निकाली काढणे, नव्याने मतदार याद्या बनवणे व ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेणे आदि प्रकारच्या 14 मागण्या महाराष्ट्र शासनाचे मुख्यमंत्री म्हणून करण्यात आलेल्या आहेत. निवेदन महाराष्ट्र प्रदेश बसपाचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, नागपूर जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, बसपाचे युवा नेते सदानंद जामगडे, सुरेंद्र डोंगरे, मुकेश मेश्राम, भंतेजी आदींच्या माध्यमातून देण्यात आले.



## निडर होऊन अंधश्रद्धा निर्मुलन करा : रंजना पाटील

**शेंदूरजना घाट :** आपण तेच करावे जे आपल्या समाजाचे, देशाचे भल्याचे आहे. जे लोक मानसिक गुलाम आहेत ते सर्वांच्या भल्याचा विचार करून निर्णय घेत नाही. म्हणून आपण आपली मानसिक गुलामी नष्ट करून जातीचे बंधनातून मुक्त व्हावे. अनिष्ट रुढी परंपरा नाकारल्या पाहिजे. अंधश्रद्धा आपण निडर होऊन नाकारली पाहिजे असे प्रतिपादन रंजना पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले. त्या प्रबोधन यात्रा अंतर्गत शेंदुरजना घाट येथील मलकापूर प्रभागात भदंत आनंद कौसल्यायन बुद्ध विहारात प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले. त्या सभेच्या अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. प्रबोधन यात्रा मार्गदर्शक अशोक सरस्वती यांनी मानसिक गुलामी हीच सर्व गुलामीची जननी या विषयावर व्याख्यान दिले. त्यावेळी संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी प्रबोधन यात्रा महोत्सवाचे उपक्रमाबद्दल माहिती दिली. विजया दुपारे यांचे देखील भाषण झाले. जयराज दुपारे, शांताबाई गायकी, नारायणराव घोरपडे, मंगेश बागडे मंचावर उपस्थित होते. गोपाल पाटील यांनी संचालन आणि प्रास्ताविक भाषण केले. संदेश डोंगरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# आदिवासी समाजात वाद निर्माण करणे सत्तापक्षाचे षडयंत्र

**संविधानिक अधिकार कायम ठेवा अन्यथा आदिवासी समाज रस्त्यावर उतरेल ! हरिष उईके**

**नागपूर :** गोंडवाना गणतंत्र पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हरीश उइके यांच्या नेतृत्वाखाली यशवंत स्टेडीयम येथे आदिवासी समाज बांधवांच्या हजारो संख्येत एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. आदिवासी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सत्तापक्षाने बंजारा व धनगर समाजाचा वाद आमच्या समाजाच्या मागे लावल्यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. आदिवासींचे आरक्षण हे धनगर व बजारा समाजाला कसं देतात हा वाद निर्माण करण्याचे षडयंत्र सत्ता पक्षाचे आहे. आदिवासींच्यामधून बंजारा व धनगर समाजाला अनुसूचित जातीचे आरक्षण देऊ नये. असे व्यक्तव्य हरीश उईके यांनी केले आहे. राष्ट्रीय उद्यानामध्ये असणाऱ्या वाघाच्या हल्ल्यातून शेजारी गावातील राहणाऱ्या लोकांना वाचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उपाययोजना करावी. तसेच त्यांच्या संरक्षणाकरिता सोलर कंपाउंड लावण्याची व्यवस्था करावी. मृत व्यक्तीच्या कुटुंबांना 50 लाख रुपयांची मदत देवून कायमस्वरूपी नोकरी देण्यात यावी. आमचे संविधानिक अधिकार कायम ठेवा अन्यथा आदिवासी समाज रस्त्यावर उतरेल व एकूण 30 मुद्द्यांवर शेतकरी सेतमजूर शिक्षणाचे प्रश्न स्वास्थ सुविधाच्या प्रश्नांना घेऊन शेतकऱ्यांचे कर्जमाफी सातबारा कोरा कधी होणार? विद्यार्थ्यांना नोकरी व शिक्षणाचे प्रश्न कधी सुटणार? इतर सर्व प्रश्नांना घेऊन जल जंगल जमीन बचाव प्रश्नांना घेऊन हा आंदोलन करण्यात आले होते. या धरणे आंदोलनात पक्षातील सर्व पदाधिकारी व मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते अशी मागणी गोंडवाना गणतंत्र पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.



# आजच्या वाहवत चाललेल्या काळाला बुद्धी आणि अनुभव असलेले ज्येष्ठ वठणीवर आणू शकतात : मुख्याधिकारी झंवर

**चोपडा :** (अनिलकुमार पालीवाल) 'आज तुम्ही आम्ही ज्या विकासाच्या गोष्टी करतोय त्या विकासात माणुसकी कुठे गेली आहे?' असा प्रश्न उपस्थित करत वरील शब्दांत ज्येष्ठांच्या बुद्धी आणि अनुभवाचे महत्त्व फेस्कॉम अर्थात ज्येष्ठ नागरिक संघांच्या महासंघाच्या 45 व्या वर्धापन दिन कार्यक्रमात प्रमुख अतिथी न.प. नूतन युवा मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी स्पष्ट केले. ज्येष्ठ नागरिक संघ, चोपडाच्या कार्यालयात आज ज्येष्ठ नागरिक महासंघ महाराष्ट्र (फेस्कॉम) यांच्या 45 व्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन संपन्न झाले. जेष्ठ नागरिक संघ चोपडाचे अध्यक्ष जयदेव देशमुख यांच्या हस्ते फेस्कॉमचे संस्थापक राधाकृष्ण भट यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून व खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी न.प. चोपडाचे नूतन मुख्याधिकारी झंवर यांचा शॉल पुष्पगुच्छ देऊन फेस्कॉमचे खानदेश प्रादेशिक विभाग पश्चिमचे समन्वयक/चोपडा ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष विजय करोडपती यांनी तर शहराचे आरोग्य दूत डॉ. विकास हरताळकर यांचे स्वागत संघ अध्यक्ष जयदेव देशमुख यांनी केले. याप्रसंगी अध्यक्षीय मनोगतात विजय करोडपती यांनी फेस्कॉमची स्थापना, वाटचाल, फेस्कॉमने ज्येष्ठांसाठी केलेले काम, शासन दरबारच्या मागण्या याचा सविस्तर आढावा घेतला. तसेच आज कोणांकडेच वेळ नसलेल्या गतिमान काळात ज्येष्ठांनी भावनेच्या भरात वाहून न जाता, आज महाराष्ट्रातच सर्वात जास्त मुले ज्येष्ठ आई-बापांना वागवित नसल्याच्या 6500 तक्रारी आहेत, तेव्हा ज्येष्ठांनी स्वतःला ओळखा व स्वतःही सक्षम रहा असे समर्पक उदाहरण, कविता यांद्वारे आवाहन केले.




कार्यक्रमाचे प्रास्तविक व संचालन फेस्कॉम तालुका सचिव शांताराम जे. पाटील यांनी सुंदर व खुसखुशीत शैलीत केले, तर आभार ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव विलास पाटील यांनी मानलेत. या फेस्कॉमच्या 45 व्या वर्धापन दिन कार्यक्रमास संघाचे उपाध्यक्ष जे. एस. नेरपगारे, कोषाध्यक्ष दिलीप पाटील, सचिव सहसचिव विलास पाटील, फेस्कॉम जिल्हा संघटक प्रमोद डोंगरे, प्रा. श्याम गुजराथी, गोविंदा बापू महाजन, राजेंद्र साळुंखे, ॲड. व्ही. बी. पाटील, रमेश शिंदे, सर्वश्री एन. डी. महाजन, बारी, मराठे, प्रा. एस. एम. पाटील, गोकूळ पाटील, पेंढारकर, प्रा. एस. के. पाटील, देविलाल बाविस्कर, मगरे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी व संघ सदस्य यांची उपस्थिती होती.

# आंबेडकरी कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या त्यागाची जाणीव ठेवावी : आर. एस. तायडे

**बडनेरा :** दुभंगलेल्या सामाजिक आणि राजकीय चळवळीला सुयोग्य दिशेने गतिमान करण्यासाठी बहुजन तथा आंबेडकरी कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या त्याग आणि समर्पणाची त्याच बरोबर त्यांच्या उपकाराची जाण ठेवून मार्गक्रमण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण समाज आणि नेत्यांमधला दुआ हा कार्यकर्ता असतो. म्हणून आंबेडकरी समाज तथा बहुजन समाजाच्या चळवळीतील कार्यकर्त्यांला धम्माचे अधिष्ठान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची जाण असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय तरणोपाय नाही. नेतृत्वाच्या अभावामुळे कार्यकर्ते सैरभैर झालेले असून पद, पैसा आणि प्रसिद्धीच्या प्रलोभनांना बळी पडून कार्यकर्ते शत्रूच्या गोटात सामील होत आहेत. असे कार्यकर्ते समाजाचे कधीच भले करू शकत नाहीत. परंतु पुष्पा बोरकर यांच्या कविता, कथा, नाटक हे बंडखोरीची भाषा बोलतात असे प्रतिपादन साप्ताहिक वज्जीसंदेशचे सहसंपादक आर. एस. तायडे यांनी केले. ते सुप्रसिद्ध आंबेडकरी ज्येष्ठ कवयित्री, कथाकार पुष्पा बोरकर यांच्या 70 व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी पब्लिक एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष राजू बसवनाथे, आधार शहरी बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापक ज्योती राठोड, साप्ताहिक वज्जी संदेशच्या मुख्य संपादक माया वासनिक, कार्यकारी संपादक धर्मशील गेडाम, विलास थोरात उपस्थित होते. बडनेरा स्थित पवन नगर येथील निवासस्थानी सुप्रसिद्ध कवयित्री व कथाकार पुष्पा बोरकर यांच्यासह त्यांचे पती नामांतर लढ्यातील लढवय्ये कार्यकर्ते प्रकाश बोरकर यांचाही यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. वज्जी संदेशचे सहसंपादक आर. एस. तायडे हे सातत्याने दलित, पीडित, शोषित, वंचित बहुजन समाजातील सामाजिक शैक्षणिक, धार्मिक, राजकीय तथा आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांचेवर होणारे अन्याय अत्याचाराचे प्रश्न आपल्या कविता लेखांमधून मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असतात. उपेक्षित वंचित समाजाने अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या हाती बंडाचे निशाण देताना पुष्पा म्हणतात अजूनही वेळ गेलेली नाही. आता तरी एक व्हा. नेक व्हा. एकजूटीशिवाय आपल्याला पर्याय नाही. अशा आशयाची ऊर्जा प्रदान करतात. वज्जीसंदेश परिवाराच्यावतीने पुष्पा बोरकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांना सुखमय, आनंददायी व निरोगी दीर्घायुष्य लाभो, अशी तथागताचरणी मंगल कामना व्यक्त करीत असल्याचे प्रतिपादन माया वासनिक यांनी केले. याप्रसंगी राजू बसवनाथे आणि ज्योती राठोड यांनी सुध्दा पुढील उज्वल भविष्यासाठी पुष्पा बोरकर यांना मन:पुर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विलास थोरात यांनी केले.



बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

**प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड,
वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी

**निलेश कांबळे**
मो. 94236 34976
**एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर,
सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर

**सुनील कुंभारे**
मो. 98238 94329

**विशाखा नारायणे**
मो. 99602 41648
**एरिया :** जोगी नगर , काशी नगर,
धाडीवाल ले आऊट,
सुयोग नगर, रानवाडी

**प्रमोद चहांदे**
मो. 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट,
संयोग नगर, नरेंद्र नगर,

**चंदू नगरारे**
मो. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर,
अभयनगर, जयवंतनगर,
भीम नगर, जोगी नगर.

**निलेश वालदे**
मो.9764772886
मोहन नगर. गौतम नगर,
गड्डीगोदाम परिसर

**मसारकर**
मो. 918080158604
धाडीवाल ले आउट.

**लिना विनोद भोवते**
मो.9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक,
नाराघाट.

**प्रविण राजाराम ठवरे**
मो. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.

**रितेश अनिल बोदेले**
मो. 9511843694
WCL पॉव ग्रीड

**गगन प्रताप नाहारकर**
मो. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.

**प्रमोद बागडे**
मो. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.

**बी प्रकाश राव**
मो. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.

**पुष्पीत कराडे**
मो. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.

**राहुल राजकुमार जांबुळकर**
मो. 9673392025, नारी.

**श्रीकांत वासनिक**
मो. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर,
रमा नगर, जय भिम नगर.

**मंगेश शंभरकर**
मो. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर,
भिम नगर, शताब्दी नगर.

**निळकंठ वि. जवादे**
मो. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.

**विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी,
गोधनी रोड, .
मो. 7447767922

**आशिष थुल**
मो. 9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर

**राम मानवटकर**
मो. 8626037360,
न्यू. मनिष नगर

**अमन शरणागत**
मो.9575673895
टेकअप सिटी , दिघोरी,
बहादूरा पेपर एजन्सी,

**राहुल आठवले**
मो.8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान,
काटोल रोड, नागपूर

**दिगाबर पांडुरंग वासनिक**
मो.9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी

**गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर , अभयनगर
मो. 9975941830

**स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर. मो. 96046 54382

**योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648

**दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग,
पी. डब्ल्यू एस. कॉलेज परिसर
मो. 8806511702

**गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टड़ , बेसा सेंटर,
पेट्रोल पंप जवळ, बेसा
मो.9921552488

**राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो. 9850335018

**विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757

**शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर,
अंबाझरी मो. 9767987363

**संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मो. 8657565247

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648